| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १८ वा | मंगळवार, दिनांक ३१ मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# नालंदा मंदिरात चेंगराचेंगरी, ९ जणांचा मृत्यू

## यात ८ महिला, ६ पेक्षा जास्त जखमी; दर्शनाच्या घाईगर्दीत झाली दुर्घटना



**नालंदा/वृत्तसंस्था :** बिहारमधील नालंदा जिल्ह्यात मंगळवारी सकाळी शीतला माता मंदिरात चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत ९ लोकांचा मृत्यू झाला. गर्दीत दबल्याने ८ महिलांचा जागीच मृत्यू झाला होता, तर एका पुरुषाने रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. मंगळवारी शीतला अष्टमीच्या निमित्ताने मोठ्या संख्येने भाविक या मंदिरात पोहोचले होते. तिथे जत्राही भरली होती. घटनास्थळी उपस्थित लोकांनी सांगितले की, गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी पुरेसे बंदोबस्त नव्हते.

दर्शनाच्या घाईत धक्काबुक्की झाली. गोंधळात अनेक लोक गर्दीत दबले गेले. मोठ्या संख्येने लोक जखमीही झाले आहेत. दुर्घटनेनंतर मंदिर आणि जत्रा बंद करण्यात आली आहे.

दुर्घटनेत मृत पावलेल्या ६ लोकांची ओळख पटली आहे. यात रीता देवी (५०), कांती देवी (५०), आशा देवी (६५), देवंती देवी (३५), अनुष्का देवी (४०) आणि रेखा देवी (४५) यांचा समावेश आहे. मृतांपैकी ६ नालंदा येथील रहिवासी आहेत. एक नवादा येथील, एक पटना येथील आहे, तर एकाची ओळख पटलेली नाही.

अपघातानंतर पटना आयुक्तांना बिहार शरीफ येथे पाठवण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना चौकशीचे निर्देश दिले आहेत. सरकारने मृतांच्या वारसांना ६ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची घोषणा केली आहे. तर केंद्र सरकारने २ लाख रुपयांच्या नुकसान भरपाईची घोषणा केली आहे.

चैत्र महिन्याच्या शेवटच्या मंगळवारमुळे पाटणा आणि आसपासच्या भागातूनही दर्शनासाठी आले होते. यामुळे गर्दी खूप वाढली.

मंदिर परिसर लहान होता. गर्दी नियंत्रित करण्याची व्यवस्था नव्हती. लोकांमध्ये आधी दर्शन घेण्याची चढाओढ लागली.

लोक रांगेत उभे राहण्याऐवजी पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागले. यामुळे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. अनेक लोक गर्दीखाली दबले.

घटनास्थळी उपस्थित लोकांनी सांगितले की अपघातानंतर पोलीस आणि रुग्णवाहिका पोहोचायलाही उशीर झाला.

**दर्शन करण्याच्या घाईत चेंगराचेंगरी झाली**

महिला भाविकांनी सांगितले की चैत्र महिन्याचा हा शेवटचा मंगळवार आहे. येथे जत्रा भरली होती. गर्दी खूप वाढली. मंदिराचे गर्भगृहही लहान आहे. लोक लवकर दर्शन घेण्यासाठी एकमेकांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते. कोणीही रांगेत उभे राहून पूजा करू इच्छित नव्हते. दुसऱ्या भाविकाने सांगितले, 'सुरक्षेची कोणतीही व्यवस्था नव्हती. मंदिराच्या आत प्रचंड गर्दी होती. पोलिसांचा जवान आत तैनात नव्हता. गर्दीला वळवण्यासाठी किंवा दोन रांगांमध्ये विभागण्यासाठी कोणतीही व्यवस्था नव्हती. मंदिराचे पुजारीच लवकर-लवकर दर्शन घेऊन बाहेर पडायला सांगत होते. याच दरम्यान एका महिलेला चक्कर आली आणि ती तिथेच पडली. काही लोक तिला सावरू लागले आणि गर्दीला मागे हटवण्याचा प्रयत्न केला. याच वेळी चेंगराचेंगरी झाली.'

**४० मिनिटांनी रुग्णवाहिका पोहोचली**

मंदिरात उपस्थित असलेल्या एका भाविकाने सांगितले की, 'गर्दीच्या धक्काबुक्कीनंतर अनेक महिला बेशुद्ध पडल्या होत्या. काही वेदनेने ओरडत होत्या. लोकांनी पोलिसांना माहिती दिली. सुरुवातीला २-३ पोलीस कर्मचारी पोहोचले. त्यांच्यासोबत भाविकांनी जखमी महिलांना बाजूला झोपवले. रुग्णवाहिकेसाठी अनेक वेळा फोन करण्यात आला. घटनेच्या सुमारे ४० मिनिटांनंतर पहिली रुग्णवाहिका पोहोचली आणि काही पोलीस अधिकारीही आले. त्यानंतर जखमींना रुग्णालयात पाठवण्यात आले. महिलांना उचलत असतानाच असे वाटत होते की त्यापैकी काही जणींचा मृत्यू झाला आहे.'

**मंदिरात विशेष पूजा असल्याने गर्दी होती**

हे मंदिर नालंदा जिल्ह्यातील बिहारशरीफपासून सुमारे ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मघडा गावात आहे. चैत्र महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी येथे विशेष पूजा केली जाते.

या दिवशी घरांमध्ये चूल पेटवली जात नाही. भक्त देवीला आदल्या दिवशी बनवलेल्या थंड जेवणाचा नैवेद्य दाखवतात. त्यामुळे येथे मोठी गर्दी होते.

कासार सिरसी (ता. निलंगा) येथे सशस्त्र दरोड्याची घटना

# कासार शिरशी पोलीस स्टेशनची तत्पर कारवाई; एकास केले जेरबंद, इतरांचा शोध सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील कासार सिरसी पोलीस ठाणे हद्दीत तांबाळा येथील 'ब्रिक यार्ड स्पोर्ट क्लब' मध्ये दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी अज्ञात व्यक्तींकडून दरोड्याची गंभीर घटना घडली. या प्रकरणी कासार सिरसी पोलीस ठाण्यात गुरनं ५५/२०२६ कलम ३१० (२), ३११ भारतीय न्याय संहिता (इछड) व सहकलम ३/२५ भा. ह. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी फिर्यादीने यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पाच अनोळखी व्यक्तींनी क्लबमध्ये घुसून बंदुकीचा धाक दाखवत दहशत निर्माण करून रोख रक्कम व मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेत सशस्त्र दरोडा टाकला.

घटनेची पोलीस स्टेशन कासार शिरशी यांना रात्री १०.०० वाजताचे सुमारास माहिती मिळताच सदर बाब तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कासार सिरसी पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ परिसरात नाकाबंदी करून आरोपींचा शोध सुरू केला. कासार शिरशी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी प्रवीण राठोड यांनी तात्काळ पोलीस स्टेशन औराद शहाजनी, किल्लारी, निलंगा, औसा, उमरगा व पोलीस स्टेशन बसवकल्याण राज्य कर्नाटक या पोलीस स्टेशनची तात्काळ संपर्क साधून घडलेल्या घटनेची माहिती देऊन नाकाबंदी करणेबाबत माहिती दिली. दरम्यान, दरोड्यात वापरण्यात आलेली संशयित विनानंबर इनोव्हा गाडी भरधाव वेगाने शिराढोण कडे पळून जात असल्याचे पोलिसांच्या माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून शिराढोण पाटी येथील नाकाबंदी पॉईंटवर सदर वाहन ३१ मार्च २०२६ चे मध्यरात्री १२.०० वाजताचे सुमारास अडविले. त्यावेळी वाहनातून उतरून अंधाराचा फायदा घेत पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना पोलिसांनी एकास शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्याचे नाव कार्तिक कलाप्पा भोकले (वय २७ वर्ष, रा. भूसनी वाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव) असे असून त्याने आपल्या इतर चार साथीदारांसह सदर दरोड्यात सहभाग असल्याची कबुली दिली आहे. त्याच्या ताब्यातून वाहन, मोबाईल फोन तसेच दरोड्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई दिनांक ३० मार्च रोजी रात्री सुमारे १०.०० ते दिनांक ३१ मार्च चे मध्यरात्री १२.३० या कालावधीत अत्यंत तत्परतेने पार पाडण्यात आली. घटनास्थळी अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा ढुमे, उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर रायबोले, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी अधिकारी सुधाकर बावकर तसेच इतर वरिष्ठ अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी करून पुढील तपास कामी मार्गदर्शन केले आहे.

सदर प्रकरणातील फरार चार आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा तसेच कासार सिरसी पोलीस ठाण्याच्या अधिकारी अमलदारांचे चार विशेष पथके तयार करून रवाना करण्यात आली असून इतरांचा लवकरच अटक करण्यात येणार आहे.

ही संपूर्ण कारवाई माहिती मिळाल्यापासून तत्काळ अवघ्या काही तासातच पोलीस ठाणे कासार सिरसीचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप गर्जे, पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील तसेच पोलीस अंमलदार राजू हिंगे, हरि डावरगावे, आबा इंगळे, शंकर बुडे, मनोज चव्हाण, श्रीनिवास देशमुख, बाळू गायकवाड, नवनाथ इंदापुरे आदींनी संयुक्तरित्या पार पाडली.

या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

**प्रभात किरणे**

किती धडपड
कमविण्यासाठी धन
का नसे घेती काळजी,
तंदुरुस्त तन धनामध्ये
धन मोठे,आपलेच शरीर
आरोग्य शिक्षणात जग
व्हावे साक्षर
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर
९१-९७६४७ ८८२८८

**कुजबुज**

-डॉ. संजय जमदाडे



बाजारात युद्ध प्रलय, रुपयाही निचांकावर. मार्चमध्ये युद्धामुळे ५२ लाख कोटींचे नुकसान...

**चिमटा**



दयाचा
लातूरमधील
फुटपाथ पहिल्यांदा
मोकळी करा !
रस्त्यावर चालणे
अवघड आहे !!
वाढत्या गर्दीने चौका
चौकात शिस्त लावणे
कठीण आहे!!!

# दयानंद कला महाविद्यालयाच्यावतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी म्हणून कर्तव्यदक्षपणे कार्य करत असलेल्या श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांना ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम उत्कृष्टरीत्या राबविल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते वर्षा ठाकूर-घुगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांची उपस्थिती होती.

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये कार्यालयाचे संकेतस्थळ, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयाचा डॅशबोर्ड, व्हॉट्सप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), ब्लॉकचेन तसेच भौगोलिक माहिती प्रणाली (ऋखड) अशा सात महत्त्वाच्या घटकांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले.

या विशेष मोहिमेअंतर्गत दोन टप्प्यांमध्ये झालेल्या मूल्यमापनानंतर राज्यातील ३६ जिल्हाधिकारी कार्यालयांमधून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यात चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. ही संपूर्ण लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

# 'महावीर जयंती' निमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा

**मुंबई :** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महावीर जयंती, तीर्थंकर भगवान महावीरांचे जीवन कार्य तसेच त्यांच्या अहिंसा, त्याग, क्षमा, जीवदया व अनेकांतवादाच्या शिकवणीचे स्मरण करून देते. त्यांच्या आदर्श विचारांचा प्रभाव आजही भारतीय जनमानसावर दिसून येतो. भगवान महावीरांचे विचार आज सर्वाधिक प्रासंगिक आहेत. महावीर जयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

# लातूर जिल्ह्यात १ एप्रिलपासून चार विशेष डिजिटल शेती शाळा; कृषी विभाग व पाणी फाउंडेशनचा पुढाकार

**लातूर/प्रतिनिधी :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) अभियान स्वरूपात राबवण्यात येणाऱ्या हवामान अनुकूल तंत्रज्ञान उपक्रमांतर्गत, लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी एप्रिल २०२६ मध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळांचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त सहकार्याने हे प्रशिक्षण पार पडणार असून, जिल्ह्यातील प्रत्येक गावातील किमान ३० ते ४० शेतकऱ्यांनी यात ऑनलाईन पद्धतीने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

पाणी फाउंडेशनद्वारे संचलित ही डिजिटल शेती शाळा एक प्रगत ऑनलाईन व्यासपीठ असून, याद्वारे तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना पीकनिहाय शास्त्रोक्त मार्गदर्शन झूम आणि युट्युब च्या माध्यमातून दिले जाणार आहे. या उपक्रमात कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, समूह सहाय्यक, तसेच कृषी ताई व कृषी सखी यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. गावनिहाय नियोजन करून एका मध्यवर्ती ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्रित उपस्थित राहावे, यासाठी कृषी विभागाने जय्यत तयारी केली आहे.या विशेष शेती शाळांचे वेळापत्रक चार भागांत विभागले असून, त्याचे सत्र निश्चित केलेल्या दिवशी सायंकाळी ७:३० वाजता सुरू होईल. याची लिंक गावनिहाय व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या भागात १ एप्रिल रोजी पेरणीपूर्व तंत्रज्ञान, बेड तयार करणे, टोकण पद्धत, आंतरपीक आणि बीजप्रक्रिया यावर मार्गदर्शन होईल. दुसऱ्या भागात ८ एप्रिल रोजी बीजामृत, जिवामृत आणि दशपर्णी अर्क यांसारख्या जैविक व नैसर्गिक निविष्ठा निर्मितीवर भर दिला जाईल. तिसऱ्या भागात १५ एप्रिल रोजी एकात्मिक कीड व्यवस्थापन, सापळा पिके आणि मित्र कीटकांचा वापर यावर चर्चा होईल, तर चौथ्या भागात २२ एप्रिल रोजी भात शेती लागवडीचे आधुनिक तंत्र व यांत्रिकीकरण याविषयी सविस्तर माहिती दिली जाणार आहे. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या डिजिटल शेती शाळेचा लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे

# अवैध दारू व्यवसायावर मोठा प्रहार; 'ऑल आऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन'द्वारे सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण

## लातूर पोलिसांची सलग २१ तासांची अविरत धडक कारवाई





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध व्यवसाय व गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशानुसार व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ मार्च २०२६ रोजी पहाटे ०५.०० वाजल्यापासून ते दिनांक २९ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री ०२.०० वाजेपर्यंत सलग व अविरत विशेष मोहीम राबविण्यात आली.

या कालावधीत लातूर जिल्हा पोलीस दलाकडून एकाच वेळी विविध टप्प्यांमध्ये मास रेड (चरींी ठरळव), 'ऑल आऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन' तसेच 'ड्रंक अण्ड ड्राईव्ह' विशेष मोहीम राबविण्यात आली. या एकत्रित व समन्वयित कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध धंदे व गुन्हेगारी प्रवृत्तीवर मोठा आघात करण्यात आला आहे.

**अवैध दारू व्यवसायावर मोठी कारवाई**

दिनांक २८ मार्च २०२६ रोजी पहाटे आयोजित करण्यात आलेल्या मास रेड दरम्यान जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत, विशेषतः दुर्गम व आडवाटेच्या परिसरात लपून-छपून हातभट्टी दारू तयार करणारे तसेच देशी-विदेशी मद्याची अवैध विक्री करणाऱ्या इसमांवर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ७४ आरोपीताविरुद्ध एकूण ७४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ४,१९,३४२/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये हातभट्टी दारू, रसायन, भट्ट्या, ड्रम, प्लास्टिक कॅन तसेच देशी-विदेशी मद्याचा साठा यांचा समावेश आहे. याशिवाय मोठ्या प्रमाणावर तयार स्थितीत असलेली हातभट्टी दारू व कच्चे रसायन घटनास्थळीच नष्ट करण्यात आले.

**'ऑल आऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन'द्वारे गुन्हेगारांवर कारवाई**

त्यानंतर दिनांक २८/०६/२०२६ रोजी रात्री २३.०० वा. ते २९/०६/२०२६ रोजी ०२.०० वा. दरम्यान जिल्हाभर अचानक 'ऑल आऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन' राबविण्यात आले. या ऑपरेशनमध्ये सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी स्वतः सहभाग घेत सुमारे ७० टक्के पोलीस अधिकारी व अंमलदारांना तैनात केले होते.

या कारवाईत १९ सराईत गुन्हेगारांची धरपकड करण्यात आली असून, आर्म्स अक्ट कलम ३/२५ व ४/२५ अंतर्गत ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच मालमत्तेविषयक गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या ४ संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

**ड्रंक अण्ड ड्राईव्ह विशेष मोहिमेत कारवाई**

याच दिवशी सायंकाळी २०.०० वा. ते २३.०० वा. दरम्यान ड्रंक अण्ड ड्राईव्ह विरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २४ केसेस नोंदविण्यात आल्या असून, संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यात ३४ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती. या नाकाबंदीकरिता ३४ पोलीस अधिकारी व १४९ पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली होती.

या सर्व कारवाया अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने व समन्वय साधून पार पाडण्यात आल्या. सतत २१ तास चाललेल्या या अविरत कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये मोठ्या प्रमाणावर दहशत निर्माण झाली असून लातूर जिल्हा पोलीस दलाकडून गुन्हेगारी व अवैध धंद्यांविरुद्ध 'अशा प्रकारच्या व्यापक, अचानक व प्रभावी कारवाया यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार आहेत.

नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसांना सहकार्य करावे तसेच कोणतीही संशयास्पद माहिती तात्काळ पोलीसांना कळवावी, असे आवाहन लातूर जिल्हा पोलीस दलाकडून करण्यात येत आहे.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पंतप्रधानाचे आवाहनास साथ द्यावी...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच जनतेला आवाहन केले की, काळ आहे तो वाईट आहे. अमेरिका-ईस्त्राईल मिळून इराणवर हल्ला करीत आहेत याचे पडसाद जगात उमटत आहेत. या पडसादावर मात करण्यासाठी काही शैली बदलण्याची गरज आहे. देशात सर्वात गरज इंधनाची असते. महागाई वाढण्याचे कारण इंधनाचे दर किंवा तुटवडा हा आहे. प्रत्येक वस्तू ही ट्रान्सपोर्टींग होत असते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वितरीत होत असते. यासाठी ट्रान्सपोर्टींग आले. त्यामुळे प्रत्येक वस्तूची वाहातुक होते त्याला लागते इंधन, याचेच दर वाढले की, आपोआप वस्तूचे दर वाढतात. त्यामुळे जनतेसमोर एक मोठे संकट आहे. जनतेसमोर यातून पर्यायी मार्ग ही दिसून येत नाही. त्यामुळे विचारपुर्वक वाटचाल बरोबर कठोर निर्णयाची मोठी गरज आहे. सतत इंधनाचा वापर आता परवडणारा नाही. कमी आंतरावर जाण्यासाठी गाड्याचा वापर टाळावा लागणार आहे. पायी चालण्याची सवय ठेवावी लागणार आहे. प्रांतविधीसाठीचा सकाळी मोटारसायकलचा ग्रामीण भागात वापर होतो हे चित्र पावयास मिळते. कमीत कमी इंधनाचा वापर कसा करता येईल याचा विचार करावा लागणार आहे. ते शक्य व प्रत्येकाच्या हाती आहे. पुर्वी पेक्षा आलिकडे मोठ्या प्रमाणात गाड्याची संख्येत वाढ झालेली आहे. पुर्वी गाड्याही नव्हत्या व पेट्रोलपंपही नव्हते. गाडयाच्या संख्येत वाढ झाली व इंधनाच्या पंपाची वाढ झाली. कितीही महाग इंधनाचे दर वाढले तरी ग्राहक खरेदी करीत आले आहेत. दहा-वीस वर्षापुर्वीचे दर व सध्याचे दरात डबल वाढ झाली आहे. तरी ओरड नाही. निमुटपने इंधन गाड्यांत भरताना दिसून येत आहेत. तसेच स्वयंपाकाच्या गॅसचे झाले आहे. अमाप वापर वाढला आहे. पुर्वी मिळत होते त्यानुसार वापर ही होत आहे. पुर्वी अर्जेंट कामाकरिता स्वयंपाकाचा गॅसचा वापर केला जात होता. सध्याला जो इंधनाचा पुरवठा करणारा देश आडचणीत आला आहे. त्याच्यावर अमेरिका-ईस्त्राईल मिळून हल्ले करीत आहे. इराण हा जगाला गॅस, इंधन पुरवठा करीत होता. ज्या समुद्रीमार्गातून इंधन येत होते तोच आडवला जात आहे. एकमेव समुद्रीमार्गातून जगाला इंधन पुरवठा होत होता. तोच आडचणीत आला आहे. यामुळे आता कितीही पैसे मोजले तरी गॅस-इंधन मिळणे आवघड होत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक संकट निर्माण झाले आहे. याचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहाण्याचे आवाहन केले आहे. देशात इंधनाचा पुरवठा कमी प्रमाणात होत आहे. सर्वाधिक ओरड स्वयंपाकाच्या गॅसची आहे. यामागील कारण सरकारचे प्रामाणिक अजूनही म्हणावे तेवढे नियंत्रण नाही. जर व्यावसायिक गॅस टाकी दररोज लागते मग कमतरता असताना दररोज हॉटेलवाले कसे चालवित असतील? हा एक संशोधनाचा विषय आहे. त्याच प्रमाणे गॅस बाबत कठोर नियंत्रण अपेक्षित असताना ढिलाई दिसून येते. मुळात स्वयंपाकाचा गॅस सर्वाधिक गोरगरीब वापरतात. श्रीमंत लोक तर खाण्याची ऑनलाईन ऑर्डर करतात. त्यामुळे गॅस हा घर तेथे टाकी लागते, जेवढी घरे तेवढ्या गॅसच्या टाक्याची गरज आहे. गॅस असेल तर शिजवुन खाणार, नसता उपाशी राहाण्याची वेळ येते. त्यामळे आति जीवनाश्यक स्वयंपाकाचा गॅस आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. देशात युद्धामुळे जी परिस्थिती निर्माण झाली आहे याला जनतेनी मुकाबला केला पाहिजे. जनतेनीच लढले पाहिजे. असे जरी वाटत असले तरी प्रशासनाने यावेळी प्रामाणिक काम करण्याची गरज आहे जेणे करून यात काळाबाजार होणार नाही. अगोदरच टंचाई त्यात गैरप्रकार होत असेल तर अतिषय वाईट बाब आहे. त्यामुळे किमान गॅसधारकांना जी नियमावली बनवली आहे त्यानुसार तर वाटप होणे अपेक्षित आहे. केवळ बैठक घेणे किंवा कागदावर नियोजन करणे अयोग्य वाटते. प्रत्यक्षात कोणत्याही परिस्थिती नागरिकांना आडचण भासू नये. हॉटेल व्यावसायिकांना दररोज टाकी लागत असेल तर घरगुती गॅस सिलेंडर वापर होत नसेल कशावरून? घरगुती किमान वीस दिवस आरामात गॅस टाकी जावू शकते. या बाबीचा प्रशासनाने विचार करून नियोजन केले पाहिजे. नियोजनाची मोठी गरज आहे. संकट आहे का ते आहे यात शंका नाही. अमेरिका मागे हाटण्यास तयार नाही त्यापेक्षा इराण पेटून उठला आहे. इराण लहान देश असून त्याने अमेरिकेसमोर अटी-शर्ती ठेवल्या आहेत. शक्तीशाली अमेरिका असला तर इराणपेटून उठल्याने तो ईतरांना जाळून टाकू शकतो. ही मोठी भीती आहे. ईराण अजूनही थकलेला दिसून येत नाही. तो प्रतिहल्ला करीत आहे. लहान देश तो आठ-दहा दिवसात शरण येईल असे वाटत होते मात्र चिकट असलेल्याने ईराण तोडीस तोड उत्तर देत आहे. त्यामुळे वेळीच सावध पावले भारत उचलत आहे. यापुर्वीही सुखरूप असे इंधनाने भरलेले जहाज भारतात दाखल झाले आहे. भारत हा लोकसंख्येच्या मानाने मोठा देश आहे. त्यामुळे गरजाही अधिक जाणवतात. त्यात देशातील नागरिक सुज्ञ आहेत. विचारी आहे. शिकलेले आहेत. त्यांना माहिती आहे की, युद्ध चालू आहे. युद्धाचा परिणाम दिसून येत आहे. पंतप्रधान सर्वांशी मैत्रीपुर्ण संबंध ठेवून इंधना मागवित आहे. गॅसची कमतरता भासू नये यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करीत आहेत. त्याच प्रमाणे पर्याय म्हणून रॉकेलची सुविधा चालू केल्याचे सांगितले जात आहे. त्यानुसार मोठ्या प्रमाणात गॅसची टंचाई भासू नये यासाठी प्रयत्न केले जात आहेत. नागरिकांनी आता संयम ठेवून या संकटावर पंतप्रधान नरेंद्र मोदी जसे म्हणतात तसे वागले, चालले पाहिजे. तरच आलेल्या संकटावर मात करता येवू शकेल. मुळात आपल्या देशातील परिस्थिती ठिक आहे. इतर देशात मोठे संकट आले आहे. भारतात मोठ्या प्रमाणात गॅसचीउपलब्धता नाही. स्वयंपाकाच्या गॅस एवजी इतर सुविधा पर्याय यापुर्वीच शोधले पाहिजे होते ते शोधले गेले नाहीत. जर पर्याय उपलब्ध असता तर चिंता करण्याची गरज भासली नसती. प्रत्येकांने जर विचारपुर्वक स्वयंपाकाच्या गॅसचे नियोजन केले तर हे संकट दूर होवू शकेल. फार काळ हे संकट राहील असे वाटत नाही. लवकरच युद्धविरामाची शक्यता आहे. इराण काय अमेरिकेला युद्ध परवडणारे नाही. अमेरिकेत ट्रम्प यांच्या वागणुकीवर टिका होत आहे. त्यामुळे युद्ध लवकरच थांबणार आहे. त्यानंतर गॅस,इंधन मिळू शकेल मात्र त्यावेळी किंमती याच राहातील असे वाटत नाही. युद्धात झालेली हानी, पुर्ननिर्माण यासाठी अधिक दर इतरांना मोजावा लागेल. असे चित्र सध्याला दिसून येत आहे. नागरिकांनी संयम पाळून नियोजन करणे अपेक्षित आहे. प्रशासनाने वेळीच कडक धोरण स्विकारले पाहिजे. तरच या संकटावर मात करता येवू शकेल.

# महावीर : अहिंसेचे तेजस्वी दीप




मानवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्त्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्त्वांमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर करणारी, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारी आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्त्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात.

भगवान महावीरांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये वैशालीजवळील कुंडलपूर येथे झाला. बालपणापासूनच महावीरांचा स्वभाव अत्यंत शांत, संयमी आणि करुणामय होता. त्यांना सांसारिक सुखांपेक्षा आत्मिक समाधान अधिक महत्त्वाचे वाटत असे. लहान वयातच त्यांनी समाजातील दुःख, अन्याय आणि विषमता यांचा सखोल विचार केला. त्यांच्या मनात सतत एक प्रश्न घोळत होता की मानवाला खरे सुख कसे मिळेल? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नातूनच त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधनांचा त्याग करून तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय अत्यंत कठीण होता, कारण त्यासाठी त्यांना कुटुंब, संपत्ती आणि सर्व सुखसुविधांचा त्याग करावा लागला. त्यांनी जवळपास बारा वर्षे अत्यंत कठोर साधना केली. या काळात त्यांनी उपास, ध्यान, मौन आणि आत्मसंयम यांचा कठोर अभ्यास केला. अनेक अडचणी, संकटे आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. अखेरीस त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि 'महावीर' म्हणून ओळखले जाऊ लागले.

महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आणि जीवनोपयोगी आहे. त्यांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या पाच तत्त्वांमध्ये संपूर्ण नैतिक जीवनाचा सार दडलेला आहे. अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान आहे. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा टाळण्याचा उपदेश केला नाही, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही दुखावू नये, असा व्यापक संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे. सत्य हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. महावीरांनी सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी सांगितले की सत्य म्हणजे केवळ खोटे न बोलणे नव्हे, तर न्याय, प्रामाणिकपणा आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. आजच्या समाजात, जिथे असत्य आणि फसवणूक वाढत आहे, तिथे सत्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. परंतु त्याचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंची चोरी टाळणे एवढाच नाही, तर दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण न करणे, अन्यायाने लाभ मिळवू नये, असा व्यापक अर्थ त्यामध्ये अंतर्भूत आहे. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे मानवी जीवनाला संयम आणि संतुलन शिकवतात. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियसंयम, तर अपरिग्रह म्हणजे अनावश्यक वस्तूंचा त्याग. आजच्या उपभोगवादी संस्कृतीत अपरिग्रहाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.

महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. या तत्त्वानुसार कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे सहिष्णुता आणि संवाद यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या समाजात वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत उपयुक्त ठरतो.

महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक सुधारणांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचा विरोध केला. त्यांनी सर्वांना समानतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्मांद्वारे उन्नती साधू शकते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता.

महावीर जयंती हा दिवस या सर्व विचारांचे स्मरण करून देणारा आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, प्रवचने आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात. मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते आणि महावीरांच्या मूर्तीची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी दानधर्म आणि सामाजिक सेवा उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, परंतु मानवी मूल्ये कमी होत चालली आहेत, तिथे महावीरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो. अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचा अवलंब केल्यास समाजात शांतता आणि समन्वय निर्माण होऊ शकतो.

महावीरांच्या शिकवणुकीचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाच्या विविध स्तरांवर त्याचा परिणाम दिसून आला. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसेचा संदेश पुढे अनेक सामाजिक आणि राजकीय चळवळींचा आधार बनला. अहिंसा ही केवळ वैयक्तिक सद्गुण नसून ती समाजव्यवस्थेचा पाया ठरू शकते, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष आचरणातून सिद्ध करून दाखवला. त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढील अनेक महान व्यक्तिमत्त्वांवरही पडला आणि त्यांनीही अहिंसेचा मार्ग स्वीकारून समाजपरिवर्तनाचे कार्य केले.

महावीरांनी मानवी जीवनाला केवळ बाह्य यशाच्या चौकटीत न मोजता, अंतर्मनाच्या शुद्धतेवर भर दिला. त्यांच्या मते, खरे सुख हे बाह्य संपत्ती, सत्ता किंवा प्रतिष्ठेमध्ये नसून आत्मिक समाधानात आहे. त्यामुळे त्यांनी आत्मसंयम, त्याग आणि साधेपणा यांना विशेष महत्त्व दिले. आजच्या काळात, जिथे माणूस अधिकाधिक भौतिक सुखांच्या मागे धावत आहे, तिथे महावीरांचे हे तत्त्वज्ञान आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडते.

महावीरांच्या तत्त्वज्ञानातील अपरिग्रह हा विचार आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अनावश्यक वस्तूंचा संचय, संसाधनांचा अतिरेक वापर आणि उपभोगवादी जीवनशैली यामुळे पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. जर मानवाने अपरिग्रहाचा मार्ग स्वीकारला, तर नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाईल. त्यामुळे महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ आध्यात्मिक नाही, तर पर्यावरणपूरकही आहे.

त्याचप्रमाणे, अनेकांतवाद हा महावीरांनी दिलेला अत्यंत आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. या तत्त्वानुसार, कोणत्याही विषयाकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे आहे. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या काळात, जिथे मतभेदांमुळे संघर्ष निर्माण होतात, तिथे अनेकांतवाद हा विचार समाजाला एकत्र ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

महावीरांनी स्त्री-पुरुष समानतेचाही संदेश दिला. त्यांनी स्त्रियांनाही आध्यात्मिक प्रगतीची संधी दिली. त्या काळात, जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधनांमध्ये अडकवले गेले होते, तेव्हा महावीरांचा हा विचार अत्यंत प्रगत आणि क्रांतिकारक होता. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

महावीर जयंती साजरी करताना या सर्व विचारांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि प्रवचने होतात. अनेक ठिकाणी मिरवणुका काढल्या जातात. तसेच, दानधर्म, अन्नदान आणि गरजूंना मदत करण्याचे उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या बाह्य विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे जीवन अधिक वेगवान आणि स्पर्धात्मक झाले आहे, तिथे माणसामध्ये तणाव, असुरक्षितता आणि असंतोष वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला मानसिक शांती आणि स्थैर्य मिळवण्याचा मार्ग दाखवते. ध्यान, संयम आणि आत्मपरीक्षण यांचा अवलंब केल्यास आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो.

महावीरांचे जीवन आपल्याला हे शिकवते की खरे महानत्व हे बाह्य यशामध्ये नसून आपल्या विचारांमध्ये आणि आचरणामध्ये असते. त्यांनी अत्यंत साधे आणि संयमी जीवन जगले, परंतु त्यांच्या विचारांची उंची अत्यंत महान होती. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृती ही मानवतेच्या कल्याणासाठी होती. त्यामुळेच त्यांचे तत्त्वज्ञान आजही तितकेच प्रेरणादायी आणि उपयुक्त आहे.

महावीर जयंती हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या जीवनात कितपत अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि संयम या मूल्यांचा अवलंब करतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. जर आपण या तत्त्वांचा अंगीकार केला, तर आपण केवळ स्वतःचे जीवन सुधारू शकतो असे नाही, तर समाजातही सकारात्मक बदल घडवू शकतो.

आजच्या काळात, जिथे हिंसा, द्वेष, भ्रष्टाचार आणि असहिष्णुता वाढत आहे, तिथे महावीरांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण शांततेचा, समतेचा आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारू शकतो. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात थोड्याफार प्रमाणातही या तत्त्वांचा अवलंब केला, तर समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो.

शिक्षणक्षेत्रातही महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांचा समावेश शिक्षणात केला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ बौद्धिक विकासच नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक विकासही होईल.

महावीरांचे तत्त्वज्ञान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नाही. ते संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिकता आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा संस्कृतीतील व्यक्तीने त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास त्याचे जीवन अधिक शांत, संतुलित आणि समाधानकारक होऊ शकते.

शेवटी असे म्हणता येईल की महावीर जयंती हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो मानवतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील त्रुटी सुधारण्याची आणि एक चांगले माणूस बनण्याची प्रेरणा देतो. भगवान महावीर यांचे तत्त्वज्ञान हे आजही तितकेच जिवंत आणि उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण एक शांत, समतामूलक आणि नैतिक समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे महावीर जयंती साजरी करताना त्यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.



डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# सिव्हिल प्रकरणांमध्ये ग्राहकांचे मानसिक आरोग्य



मानसिक आरोग्य हा सिव्हिल खटल्यांमधील एक अत्यंत महत्त्वाचा पण अनेकदा दुर्लक्षित भाग आहे.
सिव्हिल प्रकरणे (कुटुंबीय कायदा, मालमत्ता, करार, नोकरी व वैयक्तिक दुखापत यांसंबंधी वाद) ग्राहकांवर मोठा मानसिक ताण निर्माण करतात.
न्यायप्रक्रियेचे संघर्षात्मक स्वरूप, दीर्घकालीन कालावधी, आर्थिक ताण आणि भावनिक गुंतवणूक यामुळे तणाव, चिंता आणि इतर मानसिक समस्या निर्माण होतात.
या संशोधनात सिव्हिल प्रकरणांमध्ये ग्राहकांच्या मानसिक आरोग्याचे महत्त्व, तणावाची कारणे आणि वकीलांची भूमिका याचा अभ्यास केला आहे.
तसेच, मानसिक आरोग्याच्या दृष्टीने न्यायव्यवस्थेतील अडचणी आणि उपाययोजना यांचा विचार केला आहे.
मानसिक आरोग्याला प्राधान्य दिल्यास न्यायप्रक्रिया अधिक प्रभावी व न्याय्य होते, असा या लेखाचा निष्कर्ष आहे.

**१ प्रस्तावना:**
सिव्हिल खटले हे फौजदारी खटल्यांपेक्षा कमी गंभीर मानले जातात, पण संबंधित व्यक्तीसाठी ते तितकेच किंवा अधिक त्रासदायक असतात.सिव्हिल प्रकरणे वैयक्तिक वादांशी संबंधित असल्याने ती नातेसंबंध, आर्थिक स्थिती आणि उपजीविकेवर थेट परिणाम करतात.
त्यामुळे हे खटले भावनिकदृष्ट्या अत्यंत तणावपूर्ण असतात.
ग्राहकांना चिंता, नैराश्य, निराशा आणि मानसिक थकवा यांचा सामना करावा लागतो.तरीही न्यायव्यवस्था मुख्यतः प्रक्रिया आणि कायदेशीर मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करते आणि मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करते.
त्यामुळे अधिक सर्वसमावेशक दृष्टिकोनाची गरज आहे.

**२ सिव्हिल खटल्यांतील तणावाचे स्वरूप:**
सिव्हिल खटल्यांमध्ये अनिश्चितता दीर्घकाळ टिकते (तारीखा पुढे ढकलणे, गुंतागुंतीची प्रक्रिया).यामुळे सततचा मानसिक ताण निर्माण होतो.
आर्थिक ताण हा एक महत्त्वाचा घटक आहे (वकिलांची फी, कोर्ट खर्च, नुकसान).भावनिक गुंतवणूक विशेषतः घटस्फोट, पालकत्व, वारसा यांसारख्या प्रकरणांत जास्त असते.
कुटुंबीय किंवा सहकाऱ्यांशी वादामुळे दीर्घकालीन मानसिक आघात होऊ शकतो.

**३ ग्राहकांवर मानसिक परिणाम:**
ग्राहकांमध्ये तणाव व चिंता वाढते.झोपेचे विकार, चिडचिड, लक्ष केंद्रित न होणे यासारख्या समस्या दिसतात.
वैयक्तिक वादांमध्ये नैराश्य (Depression) सामान्य आहे.
काही प्रकरणांमध्ये मानसिक आघात (Trauma) देखील होऊ शकतो.
योग्य मदत न मिळाल्यास या समस्या खटला संपल्यानंतरही टिकतात.

**४ कायदे व्यवसायिकांची भूमिका:**
वकील ग्राहकांच्या अनुभवात महत्त्वाची भूमिका बजावतात.
स्पष्ट संवाद, योग्य अपेक्षा आणि पारदर्शकता तणाव कमी करतात.
सहानुभूती आणि ऐकण्याची वृत्ती आवश्यक आहे.
वकील मानसिक आरोग्य तज्ज्ञ नसतात, त्यामुळे गरज पडल्यास मानसशास्त्रज्ञ/समुपदेशक यांच्याकडे मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.न्यायाधीश आणि कोर्ट कर्मचारी यांचाही ग्राहकांच्या अनुभवावर प्रभाव असतो.

**५ विशेष सिव्हिल प्रकरणे:**
कुटुंबीय प्रकरणे: घटस्फोट, पालकत्व – भावनिक संघर्ष
नोकरीचे वाद: अन्यायकारक काढून टाकणे, छळ – आत्मसन्मानावर परिणाम वैयक्तिक दुखापत: शारीरिक आणि मानसिक आघात मालमत्ता/आर्थिक वाद: आर्थिक ताण आणि दीर्घकालीन संघर्ष

**६ मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी उपाय:**
ग्राहक-केंद्रित कायदेशीर पद्धती वकिलांसाठी मानसिक आरोग्य प्रशिक्षण
समुपदेशक/मानसशास्त्रज्ञ यांच्यासोबत समन्वय ADR (मध्यस्थी, लवाद) वापर तंत्रज्ञानाचा वापर (ऑनलाइन सुनावणी)
धोरणात्मक सुधारणा

**७ संबंधित कायदे (भारतामध्ये):**
Mental Healthcare Act, 2017
मानसिक आरोग्य सेवांचा अधिकार
सन्मान, स्वायत्तता, गोपनीयता
Domestic Violence Act, 2005
मानसिक व भावनिक छळाचा समावेश
Family Courts Act, 1984
समुपदेशन आणि तडजोड प्रोत्साहन
Civil Procedure Code, 1908
मानसिकदृष्ट्या असमर्थ व्यक्तींसाठी संरक्षण
Indian Contract Act, 1872
करारासाठी सुसंगत मानसिक स्थिती आवश्यक
Rights of Persons with Disabilities Act, 2016
मानसिक आजारांना अपंगत्व म्हणून मान्यता
Legal Services Authorities Act, 1987
मोफत कायदेशीर मदत
Juvenile Justice Act, 2015
मुलांच्या मानसिक आरोग्यावर भर

निष्कर्ष
सिव्हिल खटल्यांमध्ये ग्राहकांचे मानसिक आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे, परंतु त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.
मानसिक आरोग्याचा परिणाम केवळ व्यक्तीवरच नाही तर संपूर्ण न्यायव्यवस्थेवर होतो.जर न्यायप्रक्रियेत मानसिक आरोग्याचा समावेश केला, तर अधिक न्याय्य, संवेदनशील आणि प्रभावी न्याय मिळू शकतो.

-लेखक: ॲड. अमित एल सावरे



# अपरिहार्य कपात

खनिज तेलाचे दर २०१२ मध्ये १०५ ते ११४ डॉलर्स प्रति पिंप झाले होते. तरीही तेव्हा देशात पेट्रोलचे दर ६५ ते ७४ रुपये व डिझेलचे दर ४६ ते ४७ रुपये प्रति लीटर होते. 'यूपीए' सरकारवर टीका करणार्या मोदी यांनी हे लक्षात घेतले पाहिजे.

पेट्रोल व डिझेलवरील 'विशेष जादा उत्पादन शुल्क' केंद्र सरकारने घटवले आहे. याचा फायदा सर्वसामान्य ग्राहकांना होणार नसून 'ओएनजीसी', 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन' आदी सरकारी इंधन वितरण कंपन्यांना होणार आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर वाढल्याने या कंपन्यांना महागडे तेल खरेदी करावे लागत आहे; पण किरकोळ विक्रीचे दर कायम असल्याने त्यांना तोटा सहन करावा लागत आहे. हा तोटा थोडा कमी करणे हा या कपातीमागील मुख्य उद्देश आहे. या व्यवहारात होणारा तोटा कमी करण्यासाठी डिझेल व विमानांच्या इंधनावरील निर्यात शुल्क केंद्राने वाढवले आहे. देशात या इंधनांचा पुरेसा साठा असावा असा त्यामागचा हेतु असल्याचे सांगण्यात येत आहे. स्वयंपाकाचा गॅस-एलपीजी, तसेच व्यावसायिक इंधनाच्या दरात वाढ केल्याने या कंपन्यांचा तोटा कमी झाला की नाही ते समजलेले नाही. २०१४ मध्ये जेव्हा भाजपचे सरकार केंद्रात आले, तेव्हा पेट्रोलवरील केंद्रीय कर लीटरमागे १० रुपये ४३ पैसे व डिझेलवर लीटरमागे ४ रुपये ५२ पैसे होता. मोदी सरकारने त्यात सातत्याने वाढ केल्याने जून २०२० मध्ये हा कर अनुक्रमे लीटरमागे ३२ रुपये ९८ पैसे व ३१ रुपये ८३ पैसे झाले. कोरोना काळातही हे कर कायम होते.

महसूल घटणार

२०१४ नंतर आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचा दर घसरून सरासरी ६०.४३ डॉलर्स प्रति पिंप झाला व तो बराच काळ ६० ते ६२ डॉलर्स असा राहिला. तरीही केंद्र सरकारने उत्पादन शुल्क वाढवले होते. युद्ध सुरु होण्यापूर्वीही ६९ डॉलर्स प्रति पिंप या दराने भारत तेल खरेदी करत होता. उत्पादन शुल्कातून मिळणार्या रकमेचा मोठा वाटा केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा होतो हे महत्त्वाचे आहे. आताही केवळ 'विशेष जादा उत्पादन शुल्क' घटवण्यात आले आहे. कृषी अधिभार व अन्य अधिभार, अन्य उत्पादन शुल्क हे कर कायम आहेत. डिझेल व विमानांचे इंधन यांवरील निर्यात शुल्क वाढवल्याने सरकारला आठवड्यास १५०० कोटी रुपये मिळतील; पण उत्पादन शुल्क कपातीमुळे दर आठवड्यास ७ हजार कोटी रुपयांचा तोटा होईल, असे पेट्रोलियम खात्याचे म्हणणे आहे. पेट्रोलियम क्षेत्र हा केंद्र व राज्यांचा उत्पन्नाचा एक मोठा स्रोत आहे. २०२४-२५ या वर्षात या क्षेत्रातून ७ लाख ४० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळाला. त्यापैकी केंद्राला ४ लाख १५ हजार कोटी व राज्यांना ३ लाख २५ हजार कोटी रुपये मिळाले. त्या वर्षात भारत पेट्रोलियमचा नफा १३ हजार २७५ कोटी, इंडियन ऑइलचा नफा १२ हजार ९६२ कोटी होता. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर या काळात इंडियन ऑइलचा नफा २५ हजार ४२५ कोटी रुपये आहे. एवढा नफा कमावणार्या कंपन्यांना सध्याचा तोटा सहन का करता येत नाही? असा प्रश्न सामान्यांना पडू शकतो. पेट्रोल व डिझेलवरील 'विशेष जादा उत्पादन शुल्कातून' केंद्राला २०२६-२७ या वर्षात १ लाख ६९ हजार कोटी रुपये मिळणे अपेक्षित आहे; मात्र युद्धजन्य स्थितीत सरकारचे सुमारे १ लाख १० हजार ते १ लाख ५५ हजार कोटी रुपयांचे नुकसान होण्याचा अंदाज आहे. इंधनाचे दर वाढवण्याचा पर्याय असला तरी चार राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशात निवडणुका असल्याने सरकारने तो वापरण्याचे टाळलेले दिसत आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्याने खनिज तेलाची आयात महागली असल्याने २० मार्चपर्यंत गेल्या तीन आठवड्यांत देशाची परकीय चलनाची गंगाजळी ३० अब्ज १४ लाख डॉलर्सने घटली आहे. सध्याच्या पेच प्रसंगाला केंद्र व राज्यांनी संघ भावना बाळगून तोंड द्यावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत केले. निवडणूक होत असलेल्या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीत नव्हते; मात्र पेट्रोलियम पदार्थ हा केंद्राच्या अखत्यारीतील विषय आहे. केंद्राकडून आलेल्या साठ्याचे सुरळीत वितरण करण्यापलीकडे राज्ये काय करू शकतात? सरकारी कंपन्यांना दिलासा देण्यासाठी शुल्क कपातीचा निर्णय घेणे सरकारला भाग होते हा या निर्णयाचा अर्थ आहे.

# राम गावा राम राम घ्यावा

येते मनात काही , प्रतिभा कणेकर

सहज कॅलेंडर बघत होते. यंदा रामनवमी २६ मार्चला आहे, मनानं नोंद घेतली, अन नकळत मन भूतकाळात गेले. माझ्या माहेरी रोज रात्री निजण्यापूर्वी सर्वांनी एकत्र बसून रामरक्षा म्हणण्याची पद्धत होती. आम्ही काय कुणाचे खातो रे, श्रीराम आम्हाला देतो हे समर्थांचे पद बाबांच्या सुरेल आवाजात नेहमी कानावर पडायचे. ग. दि. माडगूळकर आणि बाबूजींचे 'गीतरामायण' आल्यावर, काटकसर करून बाबांनी रेकॉर्ड प्लेअर आणि गीतरामायणाच्या एल. पी. ध्वनिमुद्रिका आणल्याचे आठवले.

कँम्पातल्या देवीच्या देवळात रामपंचायतनाच्या लहा-नशा पितळी मूर्ती होत्या. तिथे कुणा कीर्तनकारबुवांनी 'रामविजय' लावला होता. आजी नुकतीच रतलामच्या काकांकडून आली होती. तिने तिथे वाचलेले 'तुलसीरामायण' तिच्या मनात ताजे होते. मग 'आज रामविजयात काय सांगितले, अन मी रतलामला काय वाचले' असे काहीतरी ती आईला सांगत असे, ते कानावर पडत असे. रामजन्म उत्सवाला भर दुपारी आम्ही मुले एकमेकांना हाका मारत देवळामध्ये जात असू. देवळाच्या गाभार्यात केवढी गर्दी उसळलेली असे! रामाचा पाळणा हलवायला मिळावा म्हणून इकडून तिकडून वाट काढत पाळण्याशी पोहोचायचे, पाळणा हलवायचा, कुणीतरी हातावर टेकवलेला चमचाभर सुंठवडा घामेजल्या मुठीत घेऊन चटचटीत उन्हातून अनवाणी पायांनी घरी पळत यायचे!

कॉलेजला गेल्यावर मात्र मित्र-मैत्रिणींमध्ये रामाविषयी वेगळी मते व्यक्त होऊ लागली. आम्हा मैत्रिणींना वाटू लागले की, सीतेला अग्निदिव्य करायला लावणार्या आणि नंतरही कुणा एकाच्या बोलण्यावरून गरोदर सीतेचा त्याग करणार्या रामाने सीतेवर अन्यायच केलाय आणि हे अजिबात योग्य नाही केले. मित्र म्हणू लागले, आणि वाली-शंबूकाचे काय? आमच्या एका मैत्रिणीच्या घरी अशाच एकदा या गोष्टी चालू असताना तिची आजी म्हणू लागली, 'अग पोरीहो, रामाला बी दुख झालं व्हतं सीतेला शिक्षा देताना. पण त्याला वरच्या देवांनी दुष्ट रावणाला मारून टाकायचं काम दिलं व्हतं. ते त्याला करनंच पडलं. पोरीहो, राम तुमच्या-माझ्यागत साधा मानूस नव्हता. विष्णूनी दशरथाच्या पोटी जल्म घेतला व्हता. आन सीतामाई म्हंजे लक्ष्मी होती. अग्नीमधे गेली ती मायावी सीता आन आगीतून बाहेर आली ती खरी सीता'. ज्यावेळी नासिक-पंचवटीच्या किंचित अंधार्या सीतागुंफेतून वाकून, सरपटत फिरले तेव्हा कुणीतरी सांगितले की, रावणाने जिचे हरण केले ती मायावी सीता होती अन खरी सीता या गुंफेत लपून राहिली होती, तेव्हा मैत्रिणीच्या आजीची आठवण आली. पुढे लक्षात यायला लागले की, मूळ वाल्मिकी रामायणातील रामकथेतल्या अनेक प्रसंगांवर लोकप्रतिभेने अनेक नवनवे साज चढवलेत.

'रामायण' हे 'महाकाव्य' असले तरी लोकमानसातला राम खराखुरा होता. तो महाराष्ट्रातच नाही तर भारतात अनेक ठिकाणी वावरला होता. नाशिकच्या तपोवनात लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापले. पालघर-केळव्याला एका सुंदर तळ्याच्या खडकावर बसून सीता स्नान करत असे, कारण वनवासात असताना फिरत फिरत राम-सीता इथे आले होते. काही काळ इथल्या वनात राहिले होते.आम्ही चित्रकूटला गेलो होतो. हे उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश यांच्या सीमेवरील ठिकाण. इथे अनसूयेच्या प्रार्थनेमुळे पाताळातून गंगा प्रकटली व मंदाकिनी झाली. तिच्या एका तीरावर उत्तरप्रदेश तर दुसर्या तीरावर मध्यप्रदेश. चित्रकूटला रामांचा वनवासातील सर्वाधिक काळ गेला. मंदाकिनीच्या मध्यप्रदेशातल्या तीरावर वनवासी राम काही काळ जिथे वास्तव्याला होते, ते ठिकाण या घाटावर दाखवतात. इथे राम-लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती वल्कले परिधान केलेल्या आ-हेत. आणखी एका ठिकाणी, राम-लक्ष्मण-सीता या तिघांच्या आणि भरत व त्याची पत्नी आणि शत्रुघ्न व त्याची पत्नी यांच्या लहान, सुबक मूर्ती आहेत. एरवी रामासमोर हात जोडून बसलेले हनुमान इथे नाहीत, कारण तोवर राम-हनुमान भेट झाली नव्हती.



चित्रकूटाच्या उत्तरप्रदेशाच्या भागातील कामदगिरी डोंगरावर प्रथम राम-भरत भेट झाली, मात्र भरताला रामाने आपल्या पादुका दिल्या ते ठिकाण मंदाकिनीच्या एका घाटावर आहे. मंदाकिनीत रामाने पित्याला पिंडदान केले. चित्रकूटपासून जवळच एक निसर्गरम्य ठिकाण आहे. दोन बाजूंना खडकांचे किनारे अन मधून संथ वाहणारी मंदाकिनी. तिथल्या एका खडकावर राम-सीता बसत, असे सांगत, गाईडने एके ठिकाणी एक पुसट ठसा दाखवला. ते सीतेचे पाऊल! इथेच कावळ्याच्या रूपातला गंधर्व सीतेच्या अवतीभोवती करू लागला म्हणून रामाने त्याला बाण मारला व त्याला एकाक्ष केल्याची कथा घडली असे ऐकायला मिळाले.

चित्रकूटापासून काही अंतरावर मंदाकिनीच्याच तीरावर अनसूया आश्रम आहे. राम दंडकारण्याकडे निघाले असताना, अत्री-अनसूया या वृद्ध तपस्वी दांपत्याच्या आश्रमात एक रात्र थांबले होते. अनसूया व सीता यांनी रात्रभर हितगुज केले. तिथून निघताना अनसूयेने सीतेला दिव्यमाला व अलंकार देऊन ते परिधान करायला लावले. रामेश्वरलादेखील रामवनवासाच्या अखेरच्या पर्वातील कितीतरी कथा तेथील स्थळांशी निगडित आहेत, हे तिथे गेल्यावर कळले.

रामकथा अक्षरश: भारतभर गायली गेली आहे व अनेक वास्तूंमध्ये विसावली आहे. एवढेच नाही तर आग्नेय आशियातील इंडोनेशिया, थायलंड, कंबोडिया या देशांमध्येही ती विविधरूपिणी होऊन संचार करते आहे. अभिज्ञा बालीला गेली होती. तिथे रामकथेवरील एका नृत्यनाट्याच्या कार्यक्रमाला गेली असताना, तिच्या शेजारी एक मुस्लिम तरुणी बसली होती. अभिज्ञा-राजेशचे रामकथेसंदर्भात काही बोलणे चालू होते, त्यात तिनेही सहज भाग घेतला. आश्चर्याने अभिज्ञाने विचारले, तुला कशी इतकी माहिती? यावर हसून ती म्हणाली, का नसणार? इट इज अवर हिस्ट्री. मग ती रामकथेविषयी तिच्या दृष्टिकोनातून बोलत राहिली. तिकडच्या रामकथेत राम-सीता अन हनुमानाला जितके महत्त्व आहे, तितके लक्ष्मणाला नाही. तिच्या मते अयोध्या भारतात नाही. अलीकडे कळले, थायलंडच्या एका प्रमुख शहराचे नाव 'अयुत्थया' आहे. ते त्यांच्या 'रामकियेन' या राष्ट्रीय महाकाव्यातून व 'अयोध्या' या संस्कृत शब्दावरून आले आहे. त्यांच्या रामकथेत सीता ही रावण व मंदोदरीची कन्या आहे.

एक प्रश्न मात्र मनात अधूनमधून पण सतत येत राहतो, रामकथेत असं काय आहे की, रामाने सीतात्याग केल्याबद्दल त्याला लोक, विशेषत: स्त्रिया दोष देतात, तरीही शेकडो-हजार वर्षं लोकमानसात रामाला अढळ स्थान मिळालं आहे? अलीकडे रामकथेसंदर्भात दोन अतिशय चिंतनप्रवृत्त करणारी पुस्तके वा-चनात आली. एक डॉ. तारा भवाळकरांचे 'सीतायन'. त्यात ताराताईंनी लोकपरंपरेतील रामकथांमधून सीतेचा शोध घेतला आहे आणि दुसरे डॉ. अरुणा ढेरे संपादित 'बहुरूपी रामकथा'. आजवर विविध काळांत, विविध प्रदेशांत व विविध भाषांत लिहिल्या गेलेल्या रामकथांचा परिचय करून देणारे विद्वत्तापूर्ण लेख आणि अरुणाताईंची समालोचक प्रस्तावना असलेल्या या पुस्तकातून कळते, की विविध प्रतिभावंतांनी रामकथेला किती नवनवे आयाम दिले आहेत ते!

मी ज्यावेळी महात्मा गांधींची आत्मकथा वाचत होते तेव्हा गांधीजींच्या मुखी एक वाक्य आले, 'बा (कस्तुरबा) सीता होती पण मी राम होऊ शकलो नाही' या वाक्याचा मी आजही पुन्हापुन्हा विचार करतेय. काय व्यक्त करायचेय यातून गांधीजींना? त्यांना भारतात 'रामराज्य' यायला हवे होते. भरत जेव्हा वनवासात रामाच्या भेटीला आले तेव्हा, अयोध्येत सगळे कुशल आहे ना, हे जाणून घेण्यासाठी रामाने त्याला विचार-लेले असंख्य प्रश्न वाल्मिकी रामायणात आहेत. त्यांतून मात्र 'रामराज्या'ची कल्पना व्यक्त होते. वाल्मिकी रामायणातील राम आदर्श राजा, आदर्श पुत्र, आदर्श बंधू आहे. तो आधी मनुष्य आहे नंतर ईश्वरावतार होत जातो. कालौघात ज्या रामकथा लिहिल्या गेल्या किंवा मौखिक परंपरेत रचल्या गेल्या त्या रामाचे मानवीकरण आणि दैवतीकरण या हिंदोळ्यावर झुलत राहिल्या व कदाचित म्हणूनच लोकमानसाला अधिक आपल्या वाटल्या.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



आरोग्य टिप्स : कोरड्या खोकल्यावर घरघुती उपाय करुन बघा बदलत्या हंगामाच्या आपल्या शरीरांवर प्रभाव पडत असतो. सर्दी पडसे तर हमखास होतोच. विशेषतः खोकला होणे ही एक सामान्य समस्या आहे. हे त्रासदायक असते. काही घरघुती उपाय करून आपण या त्रासांपासून मुक्त होऊ शकतो. आलं आणि मीठ याच्या सेवनाने आपण कोरड्या खोकल्या पासून मुक्त होऊ शकता. या साठी १ नग आलं घेऊन त्याला थोडंस मीठ लावून त्याचे सेवन करावे. या उपायामुळे आपला खोकलाही बरा होऊन घसा देखील स्वच्छ होईल.


## २ Joke — विनोद




प्रेम

पाचवीच्या वर्गातील दोन मुले गप्पा मारत असतात.
पहिला - अरे सर्वात अवघड काम म्हणजे आपल्या शाळेतील बाईंवर प्रेम करणे.
दुसरा - का, काय झाले?
पहिला - यार, प्रेमपत्र पाठवले होते, बाईंनी गृहपाठ समजून तपासून परत दिले.
दुसरा - मग काय झाले?
पहिला - होणार काय... पूर्ण प्रेमपत्रावर लाल-लाल गोळे होते....

## ३ Message — संदेश




Kis kis ki minnaten
Kis kis ka wasta
Kis kis ki minnaten
Kis kis ka wasta
Dafa karo ishQ ko
Chalo karty hen Nashte

## ४ Thought — सुविचार



निसर्ग हा त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तिनुसार अत्यंत पाशवी आणि विषम आहे; आणि मानवाने या ना त्या मार्गाने निसर्गाच्या पाशवीपणा व विषमतेच्या केवळ स्वरुपात बदल करण्यात यश मिळवले आहे. - केदार जोशी


**संस्कृत सुभाषित**

**सुभाषित - वासनानां क्षयश्चात स्वाध्यासापनमं कुरू।।**

**अर्थ** : मन निरंतर स्वस्वरूपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो. म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

पण जेथे चंदनानीच जंगले भरलेली तेथे सरपणासाठी त्याचा उपयोग होतो, हे अति परिचयामुळेच होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. कादंबरीकार बाबूराव अर्नाळकर यांचा लढवय्या नायक
४. सर्वात चांगले
७. '---- लोहगोल भास्कर हे गगनराज' पं. वसंतराव देशपांडे)
१०. तोफवाहक गाडी
१२. गुणज्ञ
१५. इंग्रजीत मूळ मार्ग!
१६. मोठा हातोडा
१७. अळू असा असतो
१८. विनंती
१९. आश्चर्याची गोष्ट
२१. कोणत्याही गोष्टीला विचार न करता 'हो' म्हणणारा
२३. सर्दीत खवखवणारा
२५. वयाने जास्त
२६. मुदतीचा तापाचे नाव
२७. सन्मानार्थ मोबदला
३०. वृद्धत्व
३२. असह्य वेदना
३३. आझाद हिंद सेनेचे प्रमुख
३७. बगळा
३८. श्रीफळ
३९. रेशमाची गुंडाळी
४०. लहान मुलांचे गाणे
४२. किलोचे जुने माप
४३. बैठी जीवनशैली असल्यास ही जाणीवपूर्वक करणे आवश्यक
४४. मोडलेला, तुटलेला
४७. भाज्या घालून केलेल्या रोट्या
४८. बिनवासाचे पांढरे फूल
४९. प्रतिष्ठा
५०. दुर्भिक्ष्य
५२. अर्धी ओंजळ
५४. बोचके
५६. झाडावर पिकलेले फळ
५७. भक्कम, मजबूत
५८. पांढरपेशा, चाकरमानी
६०. राग, गुस्सा
६२. सत्व
६३. भाकरीचे धान्य
६४. जंगलातील प्राणी
६६. शिळीच्या विरुद्ध
६७. माफी मागणारा
७०. सुस्ती
७१. शिव्याशाप
७२. मर्कट
७३. ढीग

### उभे शब्द

२. शत्रुनाशाचे कथित मंत्रतंत्र- --- मारण
३. वाळवंट
४. एकटा
५. समुद्र
६. विनोबाची जमिनीविषयक चळवळ
८. हात टेकणे भाग पडते अशी स्थिती
९. धैर्यवान
११. ओझी वाहणारा
१३. रविवासर
१४. खास हकिकत
१६. दरवळ
१७. '-- त्याला खवखवे!'
२०. शरम
२१. यज्ञ
२२. जिंकल्यास सरशी, उलटल्यास हार ठरलेली!
२४. लहान, छोटा
२५. वर-वधूची मिरवणूक
२८. धैर्य, हिंमत
२९. पुरुष
३०. '--- तया यातना कठीण' (संत तुकाराम)
३१. कमी बोलणारा
३३. माडाचा एक प्रकार
३४. कपाळ
३५. शंकराचे एक नाव, माजी दिवंगत पंतप्रधानांचे नाव
३६. सडपातळ
३७. कमरेच्या पट्ट्याचा चाप
४०. हेच वय फक्त चिंतामुक्त
४१. अखेर, शेवट
४३. जादू
४५. उपाय, इलाज
४६. चामडे
४९. तीन अंकांनंतर खाली येणारा
५१. गिरणी
५३. एक प्रकारचा गोड भात
५५. थापा, थापा मारणे
५६. झाडाभोवतीचा कट्टा
५७. व्यायाम
५८. परीक्षा घेणारा, तपासनीस
५९. तापापूर्वीची अंगदुखी
६१. निकट
६२. देवयानीचा प्रिय
६५. नाडी
६६. थाळी
६८. नारळाचे झाड
६९. ओरखडा

### आडवे उत्तर

१.झुंजार ४.सर्वोत्तम ७.तेजोनिधी १०.रणगाडा १२.कदरदान १५.रूट १६.घण १७.खाजरा १८.विनवणी १९.नवलाई २१.होयबा २३.घसा २५.वयस्कर २६.विषम २७.मानधन ३०.जरा ३२.मरणयातना ३३.सुभाषचंद्र बोस ३७.बक ३८.नारळ ३९.लड ४०.बालगीत ४२.शेर ४३.हालचाल ४४.मोडकातोडका ४७.पराठे ४८.तगर ४९.पत ५०.चणचण ५२.पसा ५४.गाठोडे ५६.पाड ५७.कणखर ५८.पगारदार ६०.खीज ६२.कस ६३.बाजरी ६४.वनचर ६६.ताजी ६७.क्षमायाचक ७०.आळस ७१.तळतळाट ७२.माकड ७३.रास

### उभे उत्तर

२.जारण ३.रण ४.सडा ५.मकरालय ६.भूदान ८.निरूपाय ९.धीट ११.गाढव १३.रविवार १४.नवलविशेष १६.घमघमाट १७.खाई २०.लाज २१.होम २२.बाजी २४.सान २५.वरात २८.धमक २९.नर ३०.जया अंगी मोठेपण ३१.अबोल ३३.सुरमाड ३४.भाळ ३५.चंद्रशेखर ३६.सडसडीत ३७.बक्कल ४०.बालपण ४१.तड ४३.हातचलाखी ४५.तोडगा ४६.कातडे ४९.पडदा ५१.चक्की ५३.साखरभात ५५.ठोकंबाजी ५६.पार ५७.कसरत ५८.परीक्षक ५९.रसकस ६१.जवळ ६२.कच ६५.नस ६६.ताट ६८.माड ६९.चरा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### कॅप्टन अजिंक्य रहाणेच्या उत्तरानं सुद्धा डोके खाजवायची वेळ आली...

मुबई,–आयपीएल २०२६ च्या आपल्या पहिल्याच सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सच्या (केकेआर) पराभवानंतर, कर्णधार अजिंक्य रहाणेच्या चेहऱ्यावर केवळ निराशाच नव्हे, तर अनेक अनुत्तरित प्रश्नही दिसत होते. २२० धावांचा डोंगर उभा करूनही, संघ ६ गडी राखून सामना हरला, आणि या पराभवातील सर्वात मोठे वळण म्हणजे गोलंदाजी विभागातून कॅमेरॉन ग्रीनची संपूर्ण अनुपस्थिती, ज्याचे मूल्य २५.२० कोटी आहे. केकेआरने ग्रीनला केवळ एक फलंदाज म्हणून विकत घेतले नव्हते; त्याची मध्यमगती गोलंदाजी संघाच्या संतुलनाचा कणा मानली जात होती. पण जेव्हा त्याला सामन्यात एकही षटक टाकण्याची परवानगी मिळाली नाही, तेव्हा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक होते. जेव्हा रहाणेला हे विचारले गेले, तेव्हा त्याचे उत्तर कव्हर ड्राईव्हइतकेच थेट आणि तत्पर होते, मफ्तुम्ही हा प्रश्न क्रिकेट ऑस्ट्रेलियाला विचारायला हवाफ्फ या एका वाक्यात संपूर्ण कहाणी सामावलेली होती: ग्रीनच्या गोलंदाजीवर वरून बंदी घालण्यात आली आहे, आणि केकेआरचे हात बांधले गेले आहेत.

### मोदींकडून रणजी विजेत्या जम्मू आणि काश्मीर संघाचे कौतुक

**नवी दिल्ली**–रेडिओ कार्यक्रम 'मन की बात'च्या १३२ व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टी–२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला. तसंच त्यांनी जम्मू आणि काश्मीर संघाच्या पहिल्या रणजी ट्रॉफी विजेतेपदाबद्दल त्यांचं कौतुकही केलं. भारतानं या महिन्याच्या सुरुवातीला श्रीलंकेला हरवून सलग दुसऱ्यांदा टी–२० विश्वचषक जिंकला.

संघाच्या यशानं संपूर्ण देशाला आनंद : 'मन की बात'मध्ये भारतीय क्रिकेट संघाच्या विजयाबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ''माझ्या प्रिय देशवासियांनो, हा महिना देशभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी उत्साह आणि आनंदानं भरलेला आहे. जेव्हा भारतानं टी–२० विश्वचषकात ऐतिहासिक विजय मिळवला, तेव्हा देशभरात आनंदाची लाट पसरली. आपल्या संघाच्या या उल्लेखनीय यशाचा आम्हा सर्वांना खूप अभिमान आहे.''

जम्मू आणि काश्मीरच्या ऐतिहासिक विजयाचा उल्लेख : पंतप्रधान मोदींनी जम्मू आणि काश्मीरच्या ऐतिहासिक विजयाचाही उल्लेख केला. ते म्हणाले, ''गेल्या महिन्याच्या अखेरीस, आम्ही कर्नाटकातील हुबळी इथं एक अतिशय रोमांचक सामना पाहिला. हा सामना जिंकून जम्मू आणि काश्मीर क्रिकेट संघानं रणजी ट्रॉफी जिंकली.

### वाह रे पाकिस्तान! आपल्याच हिरोला केले व्हिलन; नसीम शाहवर क्रिकेटची बंदी

कराची–पाकिस्तानमध्ये कधी काय घडेल याचा काही नेम नाही. अजब–गजब निर्णय आणि अनपेक्षित घटनांसाठी पाकिस्तान ओळखला जातो. आता पुन्हा एकदा तिथे असाच एक वादग्रस्त प्रकार समोर आला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आपल्या स्वत:च्या खेळाडूवर कठोर कारवाई करण्याच्या तयारीत आहे.यावेळी हा प्रकार पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज नसीम शाह याच्याशी संबंधित आहे. पीसीबी त्याच्यावर १ ते २ वर्षाचा बंदी घालण्याचा विचार करत आहे. इतकंच नाही तर त्याला सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमधूनही वगळले जाऊ शकते, ज्यामुळे त्याला कोट्यवधी रुपयांचा फटका बसू शकतो.

नेमकं प्रकरण काय?सध्या पाकिस्तानमध्ये पाकिस्तान सुपर लीग (झएङ २०२६) सुरू आहे. या स्पर्धेतील एका सामन्यादरम्यान पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री मरियम नवाज या लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममध्ये सामना पाहण्यासाठी आल्या होत्या. त्यावेळी पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्या खेळाडूंनाही भेटल्या.

# वैभव सूर्यवंशीने घडवला इतिहास, आयपीएल इतिहासात अशी कामगिरी करणारा पहिलाच खेळाडू

## वैभव सूर्यवंशीचे आयपीएल इतिहासातील तिसरे सर्वात जलद अर्धशतक

**नवी दिल्ली:** वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ मधील पहिल्याच सामन्यात १५ चेंडूत अर्धशतक झळकावण्याचा कारनामा केला, यासह त्याने मोठा विक्रमही आपल्या नावे केला आहे.

खझङ २०२६ तरळलहर्‍ीं डीीूर्रींपीहळ ठशर्लीव: राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२६च्या पहिल्याच सामन्यात चेन्नई सुपर किंग्सचा पराभव केला. फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागांत राजस्थानची कामगिरी दमदार ठरली. या सामन्यातील आकर्षण ठरला तो १५ वर्षीय युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी. डावखुऱ्या सलामीवीराने शानदार अर्धशतक झळकावत संघाला ८ विकेट्स आणि ४७ चेंडू राखून विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. याशिवाय राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांनी पहिल्या डावात उत्कृष्ट गोलंदाजी करत चेन्नईला १२७ धावांवर सर्वबाद केलं.


वैभव सूर्यवंशीने अवघ्या १७ चेंडूत ५१ धावांची तुफानी खेळी केली, ज्यात ४ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता. त्याने केवळ १५ चेंडूत अर्धशतक पूर्ण करत राजस्थान रॉयल्ससाठी आयपीएल इतिहासातील दुसरं सर्वात जलद अर्धशतक नोंदवलं. याआधी त्याने आयपीएल २०२५मध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध १७ चेंडूत अर्धशतक झळकावलं होतं. त्यामुळे १८ चेंडूंपेक्षा कमी चेंडूत एकापेक्षा जास्त अर्धशतक करणारा तो या फ्रँचायझीसाठी इतिहासातील पहिला खेळाडू ठरला.राजस्थान रॉयल्ससाठी आयपीएल इतिहासात सर्वात जलद अर्धशतक करणारे फलंदाज यशस्वी जैस्वाल – १३ चेंडू वि. केकेआर, कोलकाता २०२३

वैभव सूर्यवंशीने आयपीएल इतिहासातील संयुक्तपणे तिसऱ्या क्रमांकाचं सर्वात जलद अर्धशतक झळकावलं. या विक्रमात त्याने युसुफ पठाण (कोलकाता विरुद्ध हैदराबाद, २४ मे २०१४), सुनील नरेन (कोलकाता विरुद्ध बेंगळुरू, ७ मे २०१७), निकोलस पूरन (लखनौ विरुद्ध बेंगळुरू, १० एप्रिल २०२३) आणि जेक फ्रेझर–मॅकगर्क दोन वेळा (दिल्ली विरुद्ध हैदराबाद, २० एप्रिल २०२४ तसेच दिल्ली विरुद्ध मुंबई, २७ एप्रिल २०२४) यांच्यासोबत स्थान मिळवलं आहे.

शार्दूल ठाकूरला कुठल्या संघाने दिली होती अशी वागणूक? हार्दिकने संघांची संगीतखुर्ची थांबवण्याचा केला उल्लेख

सूर्यवंशीने यशस्वी जैस्वालसोबत ७५ धावांची सलामी भागीदारीही रचली, ज्यात पॉवरप्लेमध्ये राजस्थानने ७४ धावा केल्या. याआधीच १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२५मध्ये शानदार कामगिरी करत एक शतक आणि दोन अर्धशतकं झळकावली होती. विशेष म्हणजे, आयपीएलमध्ये शतक करणारा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे.





एनबीएच्या नियमित हंगामातील बास्केटबॉल सामन्यात स्पर्धा करताना सॅन फ्रान्सिस्को येथे वॉशिंग्टन विझार्ड्स आणि गोल्डन स्टेट वॉरियर्सचे खेळाडू.

## माजी अंडर–१९ क्रिकेटपटूला अटक, वानखेडे स्टेडियमच्या तिकिटांचा काळाबाजार; २५ हजाराला विकले एक तिकिट

नवी दिल्ली–अलीकडेच झालेल्या टी–२० वर्ल्ड कपमध्ये भारताने अखेरच्या सामन्यात न्यूझीलंडवर विजय मिळवत तिसऱ्यांदा हा चषक जिंकला. तत्पूर्वी मुंबईतील वानखेडे मैदानावर भारताने इंग्लंडविरोधात निर्णायक विजय मिळवून अंतिम सामन्यात धडक घेतली होती. दरम्यान मुंबईत झालेल्या सामन्याची तिकिटे चढ्या दराने काळ्या बाजारात विकल्याच्या आरोपाखाली मुंबई अंडर–१९ संघाचा माजी क्रिकेटपटू बलवंत सिंग स्वरूप सिंग सोढा (वय २६) याला अटक करण्यात आली आहे. डिबी मार्ग पोलिसांनी ही कारवाई केली आहे.तिकिटांचा काळाबाजार केल्याप्रकरणी पोलिसांनी ही सातवी अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, सोढाचा फोन जप्त करण्यात आला असून त्याची तपासणी सुरू आहे. तिकिटे कुठून मिळवली आणि या रॅकेटशी अजूनही कुणी संबंधित आहे का? याचा छडा लावला जात आहे.

पोलिसांनी या प्रकरणात २४ तिकिटे जप्त केली असून ती मुंबई क्रिकेट असोसिएशनला परत देण्यात आली आहेत. ही तिकिटे कुणाला देण्यात आली होती, याची माहिती मागवली जात आहे.

तपास अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोढाने प्रत्येकी २५ हजार रुपयांना दोन तिकिटे विकली. पण ही तिकिटे त्याने कुठून मिळवली, याची माहिती समोर येऊ शकलेली नाही. या तपासाशी संबंधित पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही सोढाचा कॉल रेकॉर्ड तपासत असून आणखी माहिती हाती लागण्याची शक्यता आहे.

प्रकरण कसे उघड झाले?

आदित्य रावराणे नामक व्यक्ती चढ्या दराने तिकिटे विकत असल्याची गुप्त माहिती पोलिसांच्या हाती लागली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तोतया ग्राहक बनून रावराणेशी संपर्क साधला. विलेपार्ले येथील एका कॅफेत भेटल्यानंतर रावराणेने २५ हजार रुपयांची दोन तिकिटे विकण्यास होकार दर्शवला.रावराणेची चौकशी केली असता त्याने सिद्धार्थ सभापतीचे नाव घेतले.

यानंतर अधिक तिकिट हवे असल्याचे सांगून पोलिसांनी सभापतीला संपर्क साधण्यास लावले. सभापतीने मेघन प्रधान करवी दोन अतिरिक्त तिकिटे पाठवून दिली. यानंतर प्रधानलाही अटक करण्यात आली. यानंतर पोलिसांकडे चार तिकिट जमा झाले.

मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून मोफत किंवा अनुदानित दरातील तिकिटे चढ्या दराने पुन्हा विकण्यात येत असल्याचा अटकेत असलेल्या आरोपींवर करण्यात आला. आदित्य रावराणे आणि त्याच्या सहा साथीदारांना या महिन्यात अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आता २५ मार्च रोजी सोढालाही अटक करण्यात आली.

## शाहीन आफ्रिदी आणि सिकंदर रझावर गंभीर आरोप; पाकिस्तान सुपर लीगमध्ये भूकंप

दिल्ली–पाकिस्तान सुपर लीग २०२६ (पीएसएल) पुन्हा एकदा वादात सापडली आहे. यावेळी लाहोर कलंदर्स संघाला थेट लक्ष्य केले जात आहे. संघाचा कर्णधार शाहीन शाह आफ्रिदी आणि अष्टपैलू खेळाडू सिकंदर रझा यांच्यावर गंभीर गैरवर्तनाचा आरोप आहे. पंजाब पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या दोन खेळाडूंनी प्रस्थापित सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करून, चार अनधिकृत व्यक्तींना खेळाडूंच्या हॉटेलच्या मजल्यावर प्रवेश दिला इतकेच नाही, तर त्यांना कथितरित्या त्यांच्या खोल्यांमध्ये ''बळजबरीने'' नेले. अहवालानुसार, हॉटेलमध्ये थांबलेल्या खेळाडू आणि सपोर्ट स्टाफच्या सुरक्षेत फेरफार झाल्यावर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. सलमान नसीर यांना पोलिसांनी पाठवलेल्या पत्रात स्पष्टपणे म्हटले होते की, या पाहुण्यांना परवानगी नव्हती आणि संघाच्या संपर्क अधिकाऱ्याची विनंतीही दोनदा नाकारण्यात आली होती. असे असूनही, कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांचा विरोध असूनही शाहीन आणि रझा यांनी पाहुण्यांना आत नेले आणि ते तिथे सुमारे तीन तास थांबले.

सुरक्षा यंत्रणांनी या घटनेला ''प्रोटोकॉलचे स्पष्ट उल्लंघन'' म्हटले आहे. पंजाब पोलिसांनी लीगच्या आयोजकांकडे या प्रकरणाचा आढावा घेण्याची आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. लाहोर कलंदर्सकडून कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नसले तरी, सामन्यानंतर सिकंदर रझाने स्पष्ट केले की, आलेले पाहुणे त्याचे कुटुंबीय आणि जवळचे मित्र होते. रझाने शाहीनला निर्दोष ठरवत म्हटले, ''ते फक्त मला मदत करत होते; खरी जबाबदारी माझी आहे. मी त्या सर्वांना खूप काळापासून ओळखतो.'' या वादाच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आधीच कठोर भूमिका घेतली आहे. ऊर्जेची बचत आणि पश्चिम आशियातील सध्याचा तणाव या कारणांमुळे लीगचे सुरुवातीचे सामने क्लोज डोअर्समध्ये खेळवले जात आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव, खेळाडूंच्या हॉटेल्स आणि मैदानांबाहेर आधीच मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

नसीम शाहला सुद्धा अलीकडेच शिस्तभंगाबद्दल नोटीस बजावण्यात आली होती, यावरून हे स्पष्ट होते की, या हंगामात बोर्ड कोणतीही सवलत दाखवण्याच्या मनस्थितीत नाही. पीएसएलमध्ये हे प्रकरण कोणते वळण घेते हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. खेळाडूंवर कारवाई केली जाईल, की हा वाद सामंजस्याने मिटेल?

## आयपीएलमधून ऐनवेळी माघार घेणाऱ्या क्रिकेटपटूंवर कठोर कारवाईची गावस्करांची मागणी

नवी दिल्ली –इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ही एक अशी लीग आहे, ज्यात खेळण्याचे प्रत्येक क्रिकेटपटूचे स्वप्न असते. पण जेव्हा एखादा क्रिकेटपटू ऐनवेळी स्पर्धेतून माघार घेतो, तेव्हा त्यामुळे केवळ संघांनाच अडचणी येत नाहीत, तर चाहतेही निराश होतात. इंग्लंडचा फलंदाज बेन डकेटच्या अलीकडील एका निर्णयामुळे एका नव्या वादाला तोंड फुटले असून, भारतीय क्रिकेटचे दिग्गज सुनील गावस्कर यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. ऐनवेळी आयपीएलमधून माघार घेणाऱ्या क्रिकेटपटूंवर कठोर कारवाई करण्याची मागणी गावस्कर यांनी केली आहे. लिलावात निवड झाल्यानंतर क्रिकेटपटूंना स्पर्धेतून माघार घेण्यापासून रोखण्यासाठी सध्याचा दोन वर्षांच्या बंदीचा नियम पुरेसा नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.दिल्ली कॅपिटल्सने आयपीएल २०२६ साठी बेन डकेटला २ कोटी रुपयांना संघात घेतले होते. डकेट संघासाठी सलामीवीर म्हणून खेळेल अशी अपेक्षा होती, पण स्पर्धेच्या अगदी आधी माघार घेऊन त्याने सर्वांना आश्चर्यचकित केले. आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी डकेटने हा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयामुळे संघाच्या तयारीला मोठा धक्का बसला आहे, कारण ऐनवेळी खेळाडू माघार घेतात, ज्यामुळे संघाचा समतोल बिघडतो.

# जड्डू जड्डू:!, चेन्नईच्या चाहत्यांच्या घोषणा ऐकून जडेजा भर मैदानातच रडू लागला

अनेक वर्षे चेन्नईचा भाग असलेला रवींद्र जडेजा यंदा राजस्थानकडून खेळत होता. पण सीमारेषेवर क्षेत्ररक्षण करताना मात्र तो भावुक झालेला पाहायला मिळाला.

राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्सचा पराभव करत आयपीएल २०२६ च्या मोहिमेला विजयाने सुरूवात केली आहे.

राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स संघांमध्ये आयपीएल इतिहासातील मोठी ट्रेड डील १९व्या हंगामापूर्वी पाहायला मिळाली होती. ज्यामध्ये रवींद्र जडेजा आणि संजू सॅमसन यांची अदलाबदली दोन्ही संघांमध्ये करण्यात आली. या ट्रेडनंतर दोन्ही संघांमध्येच पहिला सामना खेळवला गेला आणि या सामन्यादरम्यान सीएसकेच्या चाहत्यांचं प्रेम पाहून जडेजा भावुक झालेला पाहायला मिळालं.

रवींद्र जडेजाने या सामन्यात एका षटकात दोन विकेट्स घेत चेन्नई संघाला मोठे धक्के दिले. यानंतर जडेजाने बंदुक चालवत केलेल्या अनोख्या सेलिब्रेशनने



सर्वांचं लक्ष वेधलं. जडेजाने सर्फराझ खान व शिवम दुबे या मोठ्या विकेट संघाला मिळवून दिल्या. जडेजाने या सामन्यात तीन षटकं टाकली. त्यानंतर जड्डू सीमारेषेजवळ क्षेत्ररक्षण करत होता. जडेजा सीमारेषेजवळ क्षेत्ररक्षणासाठी जाताच सीएसकेचे चाहते जड्डू जड्डू अशा घोषणा देऊ लागले. चाहत्यांचं प्रेम पाहून जड्डू भारावला आणि त्याचे भावुक झालेला फोटो व्हीडिओ सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहे. जडेजाला चेन्नईने ट्रेड केल्याचं पाहून चाहत्यांनी सीएसकेला सुनावलं होतं. जर्सी बदलली तरी चेन्नईच्या चाहत्यांचं जड्डूवरचं प्रेम कमी झालं नाही. 'जड्डू–जड्डू'च्या घोषणा ऐकून रवींद्र जडेजाला आपले अश्रू आवरता आले नाहीत.

### प्रेक्षकांचे प्रेम पाहून ढसा ढसा रडू लागला जडेजा

रवींद्र जडेजा २०१२ मध्ये पहिल्यांदा चेन्नई सुपर किंग्समध्ये सामील झाला होता. तेव्हापासून (२०१६ आणि २०१७ चेन्नईवर बंदी होती वगळता) तो सलग चेन्नईकडून खेळत आहे. साधारण १२ वर्षांहून अधिक काळ तो या संघाचा अविभाज्य भाग राहिला आहे. एमएस धोनीनंतर चेन्नईच्या चाहत्यांचं सर्वाधिक प्रेम जडेजालाच मिळालं. २०१२ च्या लिलावात चेन्नईने त्याला तब्बल ९.७२ कोटी रुपयांना विकत घेतलं होतं, जी त्यावेळची सर्वात मोठी बोली होती. तेव्हापासून जडेजाने आपल्या अष्टपैलू कामगिरीने चेन्नईला अनेक जेतेपदं जिंकून देण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. २०२३ आयपीएल फायनलमध्ये अखेरच्या षटकात उत्कृष्ट फटकेबाजी करत त्याने संघाला पाचवं जेतेपद मिळवून दिलं होतं.

जर्सी बदलली पण चाहत्यांचं प्रेम सारखंचं! जड्डू चाहत्यांचं प्रेम पाहून भर मैदानात रडला

रवींद्र जडेजा २०१२ मध्ये पहिल्यांदा चेन्नई सुपर किंग्समध्ये सामील झाला होता. तेव्हापासून (२०१६ आणि २०१७ चेन्नईवर बंदी होती वगळता) तो सलग चेन्नईकडून खेळत आहे. साधारण १२ वर्षांहून अधिक काळ तो या संघाचा अविभाज्य भाग राहिला आहे. एमएस धोनीनंतर चेन्नईच्या चाहत्यांचं सर्वाधिक प्रेम जडेजालाच मिळालं. २०१२ च्या लिलावात चेन्नईने त्याला तब्बल ९.७२ कोटी रुपयांना विकत घेतलं होतं, जी त्यावेळची सर्वात मोठी बोली होती. तेव्हापासून जडेजाने आपल्या अष्टपैलू कामगिरीने चेन्नईला अनेक जेतेपदं जिंकून देण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. २०२३ आयपीएल फायनलमध्ये अखेरच्या षटकात उत्कृष्ट फटकेबाजी करत त्याने संघाला पाचवं जेतेपद मिळवून दिलं होतं.

आयपीएल २०२६ च्या रिटेंशन आणि ट्रेड विंडोमध्ये चेन्नई सुपर किंग्सने (उडघ) एक अत्यंत अनपेक्षित पण धाडसी निर्णय घेतला. गेल्या १२ वर्षांपासून चेन्नईचा आधारस्तंभ असलेला रवींद्र जडेजा आणि राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन यांच्यात अदलाबदल (ढीरवश) करण्यात आली. एमएस धोनीच्या निवृत्तीनंतर चेन्नईला एका खंबीर यष्टीरक्षक–फलंदाजाची आणि भविष्यातील कर्णधाराची गरज होती. संजू सॅमसनच्या रूपाने चेन्नईला तो चेहरा मिळाला, तर राजस्थानने आपल्या ताफ्यात पुन्हा एकदा त्यांच्या जुन्या 'चॅम्पियन'ला सामील करून घेत आपली फिरकी फळी मजबूत केली.

# जलताराच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जलक्रांती आणणार - सहकार मंत्री ना बाबासाहेब पाटील

**नळेगाव– अजगर मजकुरी/** जलताराच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जलक्रांती आणणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना बाबासाहेब पाटील यांनी केले. ते चाकूर येथील यशवंत मंगल कार्यालयात सिद्धी शुगर साखर कारखान्याच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जलतारा पाणी परिषद उदघाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव होते. व्यासपीठावर प्रमुख वक्ते जलतज्ञ प्रा डॉ. पुरुषोत्तम वायाळ , माजी आमदार सीताराम घनदाट, सिद्धी शुगर साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, व्हॉईस प्रेसिडेंट प्रफुल होनराव, पी एल मिटकर, यशवंत टाळे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, चाकूर पंचायत समितीची कार्यकारी सभापती



मच्छिंद्र नागरगोजे, उपसभापती भुजंग शिंदे, नगराध्यक्ष करीम गुळवे, उपनगराध्यक्ष साई हिप्पाळे, माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, जिल्हा परिषद सदस्य उषाताई सोनकांबळे, भानुदास पोटे, सरपंच डॉक्टर भालचंद्र चाटे, पंचायत समिती गटनेते गजानन होनराव, संतोष कलवले, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी नरेंद्र हाक्के, प्रतिक केदार, काँमेश कसबे, गटविकास अधिकारी संतोष वांगवाडे, नगरसेवक भागवत फुले, नगरसेवक प्रतिनिधी शिवदर्शन स्वामी , राम कसबे, पपन कांबळे, महम्मद सय्यद सह विविध मान्यवर उपस्थित होते.


यापुढे बोलताना सहकार मंत्री ना . पाटील महाले की, जलतारा हा उपक्रम अहमदपूर आणि चाकूर तालुक्यात राबवणार असून या प्रकल्पाची गरज आपल्या सर्वांना आहे. आपण सर्व शेतकऱ्यांनी पाणी अडवलं पाहिजे व ते साठवन आवश्यक्य आहे. जलतारा या प्रकल्पामुळे अनेक स्रोतला पाणी उपलब्ध होऊ शकेल. प्रा . वायाळ हे एक समाज प्रबोधनाचे काम करतात अहमदपूर आणि चाकूर तालुक्यातील सर्व शेतकरी यांनी जलताऱ्याचा प्रकल्प स्वतःच्या शेतात राबवावा यासाठी आपल्या सिद्धी शुगर साखर कारखान्याचे कर्मचारी मदत करतील. या प्रकल्पामुळे आपल्याला पाणी कधीही कमी पडणार नाही ही असेही सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर कांबळे, बिलाल पठाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिद्धी शुगर साखर कारखान्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

पुरुषात्तम वायाळ म्हणाले की सदर योजने अंतर्गत जलतारा प्रकल्पाव्दारे जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणेस अत्यंत मोलाची मदत होत असून शेतक–यासाठी हा प्रकल्प फायदेशिर आहे. जलतारा प्रकल्प हाती घेतल्यास निश्चित जलवृध्दी होते व शेतक–यांचे उत्पन्न वाढवुन सुख समृध्दी येऊ शकते, जलतारा प्रकल्प ही महाराष्ट्र शासनाची अभिनव योजना असून त्याव्दारे अल्प भुधारक शेतक–यांना तसेच सर्व शेतक–यांना याचा मोठा फायदा होणार आहे ज्या भागात सिंचनाची सोय नाही अशा भागात जमीनीतील भुगर्भ पाण्याची पातळी वाढणार असून, त्यामुळे शेतक–यांना त्याचा मोठा फायदा होणार आहे.

जलतारा प्रकल्पामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी खोदलेला एक प्रकारचा खोल खडडा रिचार्ज संरचणा आहे याचा मुख्य उददेश जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे आणी भुजल पुर्नरभरण करणे हा आहे. जलतारा प्रणालीमध्ये जमिनीच्या सर्वात उतार भागावर सुमारे ५ फुट लांब, ५ फुट रुंद व ६ पुन्द खोल आकाराचा खड्डा खणला जातो या खड्यामध्ये दगड गोटे टाकुन तो खड्डा बुजविला जातो, खड्डा बुजवताना साधारणपणे १ फुट वरची जागा रिकामी ठेवली जाते त्यामुळे पावसाचे सदर खड्यामध्ये सहजरित्या पाणी जमा होते, आणी ते झिरपून जमिनीत मुरते असे ते

## महापारेषणचा ठाणे आणि वाड्यातील वीजपुरवठा सुरळीत- अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर केले काम



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) वाशी परिमंडळातील ठाणे भागात दि.२९.०६.२६ रोजी सकाळी सहा वाजून पाच मिनिटांनी पडघे–वाडा वीजवाहिनीवर क्षमतावाढीसाठी कुडूस उपकेंद्र जोडणीसाठी काम चालू होते. दरम्यान, खारबाव–कोलशेत या वीजवाहिनीत तांत्रिक बिघाड झाल्याने (ट्रीप झाल्याने) ठाणे शहरातील काही भाग, कोलशेतमधील काही भाग, घोडबंदरचा शहरी भाग, वाडामध्ये भारनियमन करावे लागले. दरम्यान, महापारेषण व महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर काम करून संपूर्ण ठाणे व वाडा येथील वीजपुरवठा टप्याटप्यांनी दुपारी २ वाजून २१ मिनिटांनी सुरू केला.


सकाळी सव्वादहा वाजता कोलशेतमधील १०० के. व्ही. ची वाहिनी तत्काळ पूर्ववत केल्याने वीजपुरवठा सुरू झाला. त्यानंतर दुपारी १२ च्या सुमारास ठाणे परिसरातील वीजपुरवठा सुरु करण्यात आला. खारबाव–कोलशेत ही वाहिनी खाडी क्षेत्रात असल्याने तिथे महापारेषण व महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना काम करण्यास विलंब लागला. परंतु, अधिकारी व कर्मचारी युध्दपातळीवर काम करून दुपारी वीजपुरवठा सुरळीत केला.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत, अधीक्षक अभियंता श्री. विजय आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले. दरम्यान, नागरिकांनी योग्य ते सहकार्य केल्यामुळे वीजपुरवठा तत्काळ सुरु होण्यास मदत झाली, असे महापारेषण व महावितरणकडून सांगण्यात आले.

# कोणताही चित्रपट इतिहासाची जागा घेऊ शकत नाही. - सिने अभ्यासक श्री.अनमोल कोठाडीया

## महाराष्ट्र महाविद्यालयात चित्रपट आस्वाद कार्यशाळा व लघुपट महोत्सव

**निलंगा/आयुब बागवान :** चित्रपट आणि वास्तव यातील फरक विद्यार्थ्यांनी, प्रेक्षकांनी समजून घेतला पाहिजे. कोणताही चित्रपट इतिहासाची जागा घेऊ शकत नाही. चित्रपटाची निर्मिती होताना त्यात काल्पनिक घटना, संवाद, याचा भरणा केलेला असतो, हे विसरता कामा नये. त्यामुळे चित्रपटाला वास्तव इतिहास न समजता त्याची शहानिशा केली पाहिजे, असे मत सुप्रसिद्ध सिने अभ्यासक श्री.अनमोल कोठाडीया यांनी व्यक्त केले. निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित चित्रपट आस्वाद कार्यशाळेत ते बोलत होते.



या कार्यशाळेत देश–विदेशातील लोकप्रिय लघुपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आलेत व त्यावर विद्यार्थ्यांची संवाद साधून लघुपटाविषयी समीक्षात्मक विचार श्री. अनमोल कोठाडिया यांनी मांडले. यात आकर्षण ठरले ते इराण येथील युद्धजन्य परिस्थितीवर आधारित ''आर यु फुटबॉल?'' हा २०१६ मध्ये प्रदर्शित झालेला एक विचार प्रवर्तक लघुपट व दुसरा म्हणजे मराठी भाषेतील ''गोल्डन टॉयलेट'' ज्यात शौचालय बांधण्यासाठी आपल्या कुटुंबासोबत संघर्ष केलेल्या एका करारी महिलेची गाथा आहे.

याप्रसंगी सिने अभ्यासक श्री. श्याम जैन यांनी आपली भूमिका मांडताना, महाविद्यालयात सुरू असलेल्या या उपक्रमाबद्दल गौरवोद्गार काढले, ते म्हणाले की यासारखे उपक्रम महानगरात चालतात परंतु गेल्या १३ वर्षापासून एका ग्रामीण भागातील महाविद्यालयात असा उपक्रम चालवणारे मराठवाड्यातील हे एकमेव महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांना सिने साक्षर बनविण्यात यासारख्या उपक्रमाची नक्कीच मदत होईल. चित्रपटाकडे मनोरंजन म्हणून न पाहता अभ्यास विषय म्हणून पहावे असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांना चित्रपट माध्यमाची ताकद फार मोठी आहे, त्याचा नेमका आस्वाद घ्यावा, फक्त मनोरंजन म्हणून त्याकडे पाहू नका. असा सल्ला दिला याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा कॅम्पस फिल्म सोसायटीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, सचिव डॉ. हंसराज भोसले, कोषाध्यक्ष डॉ. सचिन बसुदे, सदस्य प्रा. मनीषा घोगरे, प्रा. पूनम सातपुते, सौ.रोहीणी गोवंडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन कु. अंकिता मुळे, कु. प्रीती रांजणे यांनी केले .श्रावणी माने, अमर तुरे ,प्रशांत पाटील, अंकिता आगलावे, श्रुती पवार, हर्षविणा मुळे यांनी कार्यशाळा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. तर तंत्र–सहाय्यक म्हणून श्री. सुनील वाकळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## तरुणांनी शिक्षणाला कौशल्यात रूपांतरित करावे : आदिनाथ सांगवे

**लातूर/प्रतिनिधी :** तरुणांनी केवळ पदव्या न मिळवता आपल्या शिक्षणाला कौशल्यात रूपांतर करून जीवन समृद्ध करावे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ उद्योजक आदिनाथ सांगवे यांनी केले.महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि मलाबार चॅरिटेबल ट्रस्टद्वारे आयोजित शिष्यवृत्ती आणि प्रमाणपत्र वितरण समारंभात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी विचारमंचावर महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. आनंद शेवाळे, पर्यवेक्षक प्रा.नितीन वाणी, जनशिक्षण संस्थेच्या संचालिका सोनी दायमा, मलाबार शाखा लातूरचे व्यवस्थापक तानाजी जगताप, जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास कोल्हे आणि बाबासाहेब सोनवणे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून दिप प्रज्वलन करण्यात आले.

पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले असले तरी सर्वसामान्यांना उच्च शिक्षण परवडणारे नाही. अनेक सामाजिक संघटना वंचित, उपेक्षित, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांकरिता मदतीचा हात देत आहेत. शासनही त्यांच्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती ही त्यांच्या खडतर शैक्षणिक प्रवासात प्रेरणादायी मदत असते. मलाबार चॅरिटेबल ट्रस्ट हे सामाजिक भान ठेवून जनकल्याणाचे उत्तम कार्य करीत आहेत असेही ते म्हणाले.

यावेळी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, काळानुरूप शिक्षणाचे स्वरूप हे बदलत चालले आहे. केवळ पारंपारिक ज्ञान, कौशल्य यावर आधारित न राहता जीवनाला मार्गदर्शन करणारे कौशल्य हस्तगत केले पाहिजे. ''कर्म हाच परमेश्वर'' असून ''कर्म हीच आपली पूजा ''आहे. विद्यार्थ्यांनी आपला भविष्यकाळ घडवताना स्वतःला स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवले पाहिजे. सामाजिक बांधिलकीतून उद्योजक मदतीचे हात पुढे करत आहेत. आपणही एखाद्या क्षेत्रात जिद्द, चिकाटीने भव्य दिव्य असे यश संपादन केल्यानंतर इतरांना मदत करण्याची भावना ठेवली पाहिजे. गोरगरीब, होतकरू, वंचित उपेक्षित, अल्पसंख्यांक, एकल पालक असणारे, अनाथ विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आपले जीवन जगणे व घडवणे अधिक सुकर करत आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.अश्विनी सोमनाथ रोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.किसनाथ कुडके यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.घनश्याम ताडेवार यांनी मानले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि पालक मोठ्या संख्येने

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या चार विद्यार्थ्यांची पुण्यातील औषधनिर्माण कंपनीत निवड

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथील बी. फार्मसीच्या चार विद्यार्थिनींची दि. २७ मार्च २०२६ रोजी जेएसपीएम शिक्षण संस्था, लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या ''देवाभाऊ जॉब महाएक्स्पो २०२६'' या भरती प्रक्रियेमध्ये पुणे येथील नामांकित एजिओ फार्मास्युटिकल्स कंपनीमध्ये निवड झाली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमधून बी. फार्मसी चतुर्थ वर्षातील वैष्णवी जाधव, वैष्णवी पवार, संपदा चारथनकर व मानसी सगरे या विद्यार्थिनींची फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरिंग व गुणवत्ता नियंत्रण या महत्त्वाच्या विभागांमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळणार आहे. या पदांसाठी त्यांना दरमहा सुमारे २०,००० रुपये वेतन मिळणार असल्याची माहिती या जॉब महाएक्स्पोमध्ये देण्यात आली.या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरामणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापक व इतर कार्यालयीन कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सॅमसंगने Galaxy A57 5G, Galaxy A37 5G भारतात रोमांचक ऑफर्ससह सादर केले

गुरुग्राम,- भारत - मार्च २०२६ - सॅमसंग, भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज Galaxy A57 5G आणि Galaxy A37 5G सादर केले, जे फोटोग्राफी, कार्यप्रदर्शन, AI सक्षम दैनंदिन वैशिष्ट्यांना प्राधान्य देणाऱ्या तरुण वापरकर्त्यांसाठी Galaxy - मालिकेतील सर्वात नवीन जोड आहे.


वर्धित टिकाऊपणासह नवीन डिझाइन भाषा Galaxy A575G एक ल्युमिनियम फ्रेमसह येतो आणि 6.9mm वर, हे आतापर्यंतचे सर्वात स्लिम Galaxy - मालिकेचे उपकरण आहे. Galaxy A575G वरील स्लिमर बेझल्स डिव्हाइसचे व्हिज्युअल संतुलन सुधारतात आणि अधिक इमर्सिव दृश्य अनुभवासाठी अनुमती देतात.




Galaxy A57 5G मध्ये 120Hz रीफ्रेश रेट आहे आणि 1900nits पीक ब्राइटनेससह व्हिजन बूस्टर तंत्रज्ञान आहे जे वापरकर्त्यांना बाहेरच्या परिस्थितीत स्पष्टपणे सामग्री पाहण्यास आणि HDR सामग्रीचा आनंद घेण्यास अनुमती देते. Galaxy A57 5G आणि Galaxy A37 5G दोन्ही ग्लॅस्कोमवर आणि ऋश्चरीलेशी आणि स्क्रॅचस बॅक स्क्रूवर सिद्ध करतात. पाणी आणि धूळ यांच्यापासून सुरक्षिततेसाठी डिव्हाइसेसना IP68 रेटिंग देखील आहे. गॅलेक्सी A57 5G आणि A37 5Gare सहा Android जड अपग्रेड आणि सहा वर्षांच्या सुरक्षिततेसह टिकेल.

## औसा मतदारसंघात महिला सक्षमीकरणाला नवी उभारी : ४० गावांत 'महिला अस्मिता भवन'साठी १६.८८ कोटींची मंजुरी

**औसा/प्रतिनिधी :** औसा मतदारसंघातील महिला बचत गटांना हक्काची जागा उपलब्ध करून देत त्यांच्या सक्षमीकरणाला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पहिल्या टप्प्यात ४० गावांमध्ये 'महिला अस्मिता भवन' उभारण्यासाठी प्रत्येकी ४२.२० लाख रुपये प्रमाणे एकूण १६ कोटी ८८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.




महिला बचत गट गावोगावी सक्रिय असले तरी त्यांच्या दैनंदिन कामकाजासाठी स्वतंत्र व सुसज्ज जागेचा अभाव जाणवत होता. यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत होता. हीच गरज लक्षात घेऊन 'ग्रामसंघ इमारत – महिला सक्षमीकरण भवन' ही संकल्पना मांडण्यात आली. या योजनेअंतर्गत आमदार निधी १० लाख, जिल्हा वार्षिक योजना नाविन्यपूर्ण निधी १५ लाख आणि मनरेगा/रोहयो अभिसरण निधी १७.२० लाख अशा तीन स्रोतांमधून निधी एकत्रित करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.मात्र, या योजनेसाठी आमदार निधी व जिल्हा योजना निधी अनुज्ञेय नसल्याने प्रस्ताव अर्थ विभागाकडे प्रलंबित होता. यासाठी ८ डिसेंबर रोजी तत्कालीन अर्थमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला, तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली. अखेर २४ मार्च २०२६ रोजी अर्थ मंत्रालयाने या प्रस्तावाला विशेष मंजुरी दिली.

या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि लातूर जिल्हा प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.अस्मिता भवनच्या रचनेत ग्रामसंघ अध्यक्षांसाठी सुसज्ज केबिन, प्रशस्त मीटिंग हॉल, महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह तसेच बचत गटांच्या उत्पादन विक्रीसाठी २ गाळ्यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे महिलांना एकाच छताखाली बैठका, नियोजन आणि व्यवसायवृद्धीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.मुळ प्रस्ताव ९३ गावांसाठी सादर करण्यात आला होता. मात्र यंदाच्या शिल्लक निधीचा विचार करून पहिल्या टप्प्यात ४० भवनांना मंजुरी देण्यात आली असून, एप्रिलमध्ये नवीन आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर उर्वरित ५३ गावांनाही मंजुरी देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

शेतरस्त्यांच्या 'औसा पॅटर्न'नंतर आता बचत गटांच्या बळकटीकरणासाठी 'महिला अस्मिता भवन' हा नवा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी स्पष्ट केले. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हे एक निर्णायक आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल मानले जात आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ‘योग महोत्सव’ उत्साहात संपन्न, आंतरराष्ट्रीय योग दिन–२०२६ च्या १००–दिवसीय काउंटडाउन मालिकेचा ८७ वा दिवस साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त देशभर सुरू असलेल्या १००–दिवसीय काउंटडाउन मालिकेच्या अनुषंगाने ८७ व्या दिवशी लातूर येथील एमआयडीसी भागातील जेएसपीएम कॅम्पसमध्ये भव्य ‘योग महोत्सव’ उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र योग व प्राकृतिक चिकित्सा आयुर्विज्ञान परिषद, जेएसपीएम शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद विद्यालय लातूर व सप्तरश्मी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच आयुष मंत्रालय व मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. या महोत्सवात सुमारे ५०० ते ६०० विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जेएसपीएम संस्थेचे कार्यकारी संचालक अजित पाटील कव्हेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, योग हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून, तो वर्षाचे ३६५ दिवस जगण्याची जीवनपद्धती आहे. प्रत्येकाने योगाचा दैनंदिन जीवनात समावेश करणे अत्यावश्यक आहे.

महाराष्ट्र योग व प्राकृतिक चिकित्सा आयुर्विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ.किरण सगरे–पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येकाने आपल्या शारीरिक क्षमतेनुसार योगाचे विविध प्रकार अंगीकारले पाहिजेत. यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्यासह सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास साधता येतो.

या प्रसंगी रुद्रा स्पोर्ट अकॅडमीच्या महिला गटाने पारंपारिक महाराष्ट्रीयन वेशभूषेत योगासनांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच डॉ. सृष्टी पंचाक्षरी–सगरे पाटील यांनी ‘कॉमन योग प्रोटोकॉल’नुसार उपस्थितांकडून योगाभ्यास करून घेतला.

या कार्यक्रमाला प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, गणेश कदम, बाळाराम पिचारे, उपप्राचार्य मनोज गायकवाड अ‍ॅड.रामेश्वर सगरे पाटील, डॉ.सृष्टी पंचाक्षरी–सगरे पाटील, सौ.आशा झुंजे पाटील भुसनुरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.अब्दुल गालिब शेख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जेएसपीएम संस्थेचे शिक्षक, स्वयंसेवक तसेच पतंजली युवा भारत व आय.एन.ओ.च्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.




## निलंगा येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची सभासद नोंदणी




**निलंगा/आयुब बागवान :** मनसे प्रमुख मा. राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून निलंगा येथे सभासद नोंदणी अभियान जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार यांच्या पुढाकारातून राबविण्यात आले,जे महिनाभर मनसे कार्यालयातून चालू राहणार आहे.यावेळी जिल्हासचिव प्रदीप शेळके,जिल्हाउपाध्यक्ष सुरज पटेल,शहराध्यक्ष अबू बकर,तालुका सचिव गणेश उसनाळे, तालुकाउपाध्यक्ष विकास सूर्यवंशी हे पदाधिकारी उपस्थित होते.मराठी माणसाच्या हक्कांसाठी आणि स्थानिकांच्या विकासासाठी कटिबद्ध असलेल्या मनसेच्या विचारांशी जोडण्यासाठी हे अभियान आयोजित करण्यात आले आहे.

या अभियानाअंतर्गत निलंगा तालुक्यातील विविध गावांमध्ये, शहरांमध्ये तसेच प्रमुख चौकांमध्ये सभासद नोंदणी करण्यात येणार आहे.युवक, शेतकरी, कामगार, व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मनसेच्या विचारांना बळ द्यावे तसेच सभासद नोंदणीसाठी इच्छुकांनी मनसे कार्यालय,हाडगा नाका येथे मनसे पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा व आपली प्राथमिक सदस्यत्वाची नोंदणी करून घ्यावी असे आवाहन जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी निलंगेकरांना केले आहे.या कार्यक्रमासाठी मनसे कार्यकर्ते महेश सावनगिरे, राहुल चौधरी, लखन भालके, रणजीत साळुंखे, रणधीर सोळंके, सोमनाथ मेळे, विष्णू पवार आदींसह अनेकांनी परिश्रम घेतले.

## १२ व १३ एप्रिलला सहाव्या राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचे आयोजन : डॉ. अभिमन्यू टकले



**लातूर/प्रतिनिधी :** प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही दि. १२ व १३ एप्रिल २०२६ रोजी नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे सहाव्या राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. अभिमन्यू टकले यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत दिली. होळकर वाडा या ठिकाणी होणाऱ्या या संमेलनाच्या अध्यक्षपदी सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांची निवड करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

या साहित्य संमेलनाचे कार्यवाहक प्राचार्य दत्तात्रय बारगळ हे आहेत. संयोजक बापूसाहेब शिंदे हे असून सदर संमेलन मार्गदर्शक व महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब कर्णवर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. संमेलनाचे उदघाटन आ. गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होणार आहे. ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होणार आहे. शनिवार, दि. १२ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता संमेलनाचे उद्घाटन होईल. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खा. रामराव वडकुते, मध्यप्रदेशचे पालकमंत्री सैतान सिंग, माजी आमदार रामहरी रुपनवर, काळाराम मंदिराचे मुख्य पुजारी सुधीरदास महाराज, माजी आ. हरिभाऊ भदे , ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, सुभाष बोन्द्रे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन सोहळ्यात अनेक साहित्यिकांच्या ग्रंथांचे प्रकाशनही पाहुण्यांच्या हस्ते होणार असल्याचे डॉ. टकले यांनी सांगितले.

संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांना विविध पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात येणार आहे. संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात चांदवडच्या जडणघडणीत होळकरांचे योगदान या विषयावर प्राचार्य दत्तात्रय बारगळ हे मार्गदर्शन करणार आहेत. महाराजा यशवंतराव होळकर यांचे देशासाठी योगदान या विषयावर प्रा. डॉ. मधुकर सलगरे यांचे व्याख्यान होईल तर धनगर जमातीची राजकीय स्थिती या विषयावर प्रा. डॉ. विजय शिरसाठ मार्गदर्शन करणार आहेत. संमेलनाच्या चौथ्या सत्रात प्रशांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होणार आहे. या कवी संमेलनात राज्यभरातील मान्यवर कवी आपल्या रचना सादर करणार आहेत. पाचव्या सत्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर एकपात्री नाटक सादर होणार आहे. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी, रविवार दि. १३ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत विविध परिसंवाद व चर्चासत्र होणार आहेत.यामध्ये धनगर समाजाची शैक्षणिक स्थिती या विषयावर प्राचार्य धोंडीराम गडदे आपले विचार व्यक्त करणार आहेत. धनगर जमातीच्या मेंढपाळ व्यवसायाची स्थिती : काल, आज आणि उद्या या विषयावर चंद्रकांत हजारे मार्गदर्शन करणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांची त्रिजन्म शताब्दी एक आढावा या विषयावर राम लांडे हे आपले विचार व्यक्त करणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. मधुकर सलगरे, लक्ष्मण नजन यांचेही व्याख्यान होणार आहे.

संमेलनाच्या समारोप सोहळ्यास माजी आ. बच्चूभाऊ कडू, डॉ. यशपाल भिंगे, आयपीएस अधिकारी बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ पत्रकार दिलीप येडतकर, रेशमा पुणेकर , गणेश निंबाळकर, विनायक काळदाते आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून धनगर समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे डॉ. टकले यांनी सांगितले. यावेळी चंद्रकांत हजारे, संभाजीराव सूळ, प्रा. डॉ. सलगरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी साहित्यिक उज्वलकुमार माने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


## महत्वाचे कागदपत्रे असलेली बॅग गहाळ झाली आहे.

दिनांक २५ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर ते लातूर एस.टी. प्रवासात **ओमप्रकाश चंद्रनाथ सूर्यवंशी (आर्य)** यांची हँडबॅग बसमधील रॅकवर ठेवलेली गहाळ झाली आहे. सदर बॅगमध्ये आधारकार्ड, चष्माबॉक्स, जगदीश सूर्यवंशी अंबुलगा यांच्या नावे असलेला शंभर रूपयाचा बॉन्ड पेपर त्यावर हमीपत्र लिहीलेला, इतर महत्वाची कागदपत्रे सदरील हॅन्डबॅगमध्ये होते ते गहाळ (हरवले आहे) तरी कोणास सापडल्यास कळवावे, योग्य बक्षीस दिले जाईल.

**संपर्क : ओमप्रकाश आर्य ‘भूषण’ साळे गल्ली, लातूर**
**मो. ९६३७८३०५५२**



टोनर रिफिलिंग





फक्त ₹ ३००/-
मास्टर प्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


## ज्येष्ठ समाजसेवक दगडूपंत तेरकर यांचे निधन

**लातूर :** रेणापूर येथील निवृत मुख्यद्यापक तथा जेस्ट समाजसेवक दगडूपंत नागनाथराव तेरकर यांचे वयाच्या ८६ वर्षी ३० मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील एका खाजगी रुणालयात अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात शोककळा पसरली असून, सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

कै. तेरकर हे शांत, संयमी व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. त्यांनी आपल्या आयुष्यात समाजकार्यात सक्रिय सहभाग घेत अनेकांच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने तेरकर परिवारासह संपूर्ण भावसार समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.ते भावसार समाजाच्या सामाजिक कामात हिरारीने भाग घेत होते.

कै. दगडूपंत नागनाथराव तेरकर यांचा अंत्यविधी ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता भावसार समाज स्मशान भूमी, रेणापूर येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात संपन्न झाला. यावेळी भावसार समाजातील ज्येष्ठ नेते सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर,इंजिनिअर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात तीन मुले तीन मुली नातू पणतू जावई आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे.

### तीर्थकर ..

चोवीसावे तीर्थकर
श्रीमहावीर भगवान
साक्षात वैराग्य मूर्ती
सद् गुणांनी धनवान

बारा वर्षाचे मौनव्रत
खडतर सतत ध्यान
हटयोगे कष्टले शरीर
प्राप्त करे केवलज्ञान

अस्तेय ब्रह्मचर्य रूपे
जगताशी करे संधान
मानवआहोत जागृत
ठेवावे सदा अवधान

संयम करूणा शील
हेच समृध्द खानदान
हिंसा जागवी पशुत्व
किटका द्या जीवदान

दुखवू नका कुणाही
सद् वृत्तीचे अवधान
मीत सात्विक आहार
संध्यापूर्वचं जलपान

उपवासे शरीर शुध्दी
अन्नाचा नीतसन्मान
संचय संग्रह टाळावा
लोभ राक्षसा समान

णमोकार मंत्रोच्चार
संतप्त रे जीवनमान
जाण खरा जैन धर्म
निरागस हो आयुर्मान

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६


दिनांक : २८.०३.२०२६

## जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटनानुसार नागरिकांना कळविण्यात येते की, खालील यादीप्रमाणे लातूर महानगरपालिका, लातूर प्लॉट घेणाऱ्यांना नामांतरासाठी अर्ज दाखल केले आहे. तरी सदरील नामांतराबाबत नागरिकांना सूचना किंवा हरकती आहेत त्यांना हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत लातूर महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे लेखी स्वरूपात नाहरकत दाखल कराव्यात जर कोणतेही हरकती आल्या नाही तर नामांतर मंजूर करून त्याप्रमाणे नाव लावण्याचे कार्यवाही करण्यात येईल.

| अ.क्र. | जागा खरेदी करणाऱ्याचे नाव | जागा विक्री करणाऱ्याचे नाव | सर्वे नंबर व प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १८२५६ | संजयकुमार भिमाशंकर चाकुरे, रेखा संजयकुमार चाकुरे | शोभावती जयप्रकाश रेड्डी | १८१ पैकी | ५८.१७ चौ.मी |
| १८२५७ | कमलाकर गुंडेराव कलीटले | पुनम श्रीधर पवार व इतर | १८१ पैकी | ८४ चौं.मी |
| १८२५८ | सुशिला पंढरीनाथ कारडे | तुकाराम हणमंतराव पवार | ४३/१ पैकी | १८.५८ चौ.मी |
| १८२५९ | राजेंद्र सिंह | वामन पंडितराव पवार | १९१ पैकी | १८.५८ चौ.मी |
| १८२६० | रामचंद शंकर काळे | हंसराज उत्तमराव साळुंके | ८३/१/अ पैकी | ९२.९३ चौ.मी |
| १८२६१ | नागनाथ शंकर काळे | बालाजी बाबुराव कल्याणकर | ८३/१/अ पैकी | ९२.९३ चौ.मी |
| १८२६२ | रागिनी दत्तात्रय बोरफळकर | विमलबाई धोडोपंत देशमुख | | ९२.९३ चौ.मी |
| १८२६३ | रामभाऊ पांडुरग साबदे | रामेश्वर कचरूलाल जोशी | १३/२/ब पैकी | ६९.६५ चौ.मी |
| १८२६४ | ज्योती तुकाराम पाटील, तुकाराम विठ्ठलराव पाटील | शकुंतला मन्मथ आंबेगावे | ८१/२/ब पैकी | ७८.६३ चौ.मी |
| १८२६५ | प्रिया शाम जमालपुरे व इतर | शाम फुलचंद जमालपुरे | २२/अ पैकी | १७२.५ चौ.मी |
| १८२६६ | कमलाकर समींदर म्हेत्रे | बालाजी रामचंद्र शिंदे | ९०/१ पैकी | ६९.७० चौ.मी |
| १८२६७ | मेघा भागवत म्हेत्रे | शैलजा भगवानराव माने | १३/३/ब पैकी | ११४.८४ चौ.मी |
| १८२६८ | अश्विनी रमाकांत गरड | उर्मिला कमलाकर दळवी | १३/३/ब पैकी | ९२.९३ चौ.मी |
| १८२६९ | विष्णुताई व्यंकट सापन– लग्नानंतर नाव, विष्णुताई दिगंबर मधाळे– लग्नापुर्वी नाव | अनिल खंडु पाटील व इतर | ९१/१ पैकी | ९२.९३ चौ.मी |
| १८२७० | अमोल विनायकराव मुळे | विठ्ठलराव अंबाजीराव शिंदे | २५/अ पैकी | ३९४.९८ चौ.मी |
| | | | | |

स्वाक्षरित/–
**क्षेत्रीय अधिकारी**
**क्षेत्र बी**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६